पैगंबर मुहम्मद (स.)

यांचा

आदर्श

लेखक

नाथू राम

अनुवाद

मुबारक हुसेन मनियार

अनुक्रमणिका

दोन शब्द

विद्वान लेखक एक हिंदू चिंतक व विचारवंत असून ते पंजाबचे रहिवासी आहेत. त्यांना ज्ञान व कलेची विशेष आवड आहे. आपल्या आंयुष्याचा एक भाग मध्य-पूर्वेच्या इस्लामी संस्कृतीच्या केंद्रात त्यांनी व्यतित केला. त्यामुळे ती संस्कृती जवळून पाहण्याची व समजून घेण्याची त्याना संधी प्राप्त झाली. म्हणूनच इस्लामच्या विशेषज्ञांमध्ये त्यांची गणना होते. त्यांचे आणखी एक पुस्तक 'इस्लाम और औरत' अत्यंत लोकप्रिय आहे.

प्रस्तुत लेख 'दयामूर्ति का रवैया अपने शत्रुओं के साथ' या मथळ्याने प्रथमतः लेखमालेच्या रूपात 'फारान' (उर्दू मासिक) कराचीमध्ये प्रकाशित झाला होता. त्याच लेखांच्या संग्रहाला नंतर पुस्तकाचे रूप देण्यात आले, ज्याचे भाषांतर आपल्या हातात आहे.

धर्मप्रधान व्यक्ती व जातींचे एकमेकांशी बंधुत्वाचे संबंध असणे अत्यावश्यक आहे. मुख्यत्वेकरून देशहिताच्या दृष्टीने असे असणे अनिवार्य समजले जाते. धर्माच्या संबंधी आढळणाऱ्या गैरसमजुतीचे निवारण झालेच पाहिजे, धर्मांचा निष्पक्ष भावाने अभ्यास केला जावा व मनन केले जावे हेही अत्यावश्यक आहे. याच भावनेने नाथू राम यांनी ही लेखमाला सादर केली आहे आणि याच भावनेने ती प्रकाशित करण्यात आम्हास अभिमान वाटतो आहे.

- प्रकाशक

"अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे"

प्रस्तावना

आज जेव्हा आम्ही पैगंबरांचे जीवनचरित्र व त्यांच्या शिकवणींचा अभ्यास करतो, तेव्हा आम्हाला मोठे आश्चर्य वाटते की या कृपाळू, करुणामयी पैगंबरांना लोकांनी विरोध का केला? सत्य गोष्टीवर आधारित त्यांच्या शिकवणीचा देशवासीयांनी स्वीकार का केला नाही? प्रत्येक पैगंबराला त्यांच्या काळात विरोध केला गेला, त्यांचा उपहास केला गेला, सर्व प्रकारचे अत्याचार त्यांच्यावर केले गेले आणि त्यांच्यापैकी अधिकांश पैगंबरांना त्यांच्या आपल्या लोकांनीच विरोध केला व त्यांच्या अत्याचारामुळे त्यांना देशत्याग करणे भाग पडले आणि विदेश-प्रवासातच ते आपल्या रचयिता व स्वामीला, प्राणत्याग करून जाऊन भेटले. पवित्र कुरआन याच स्थितीचा उल्लेख एका सामान्य नियमाच्या रूपात अशा तऱ्हेने करतो,

"कोणताही पैगंबर त्यांच्याजवळ असा आला नाही की ज्याचा उपहास केला गेला नसावा."

याच सत्याकडे वर्का बिन नोफलने संकेत केला होता. वह्य (ईश्वरी संदेश) च्या आरंभिक काळात माननीय खदीजा (रजि.) पैगंबर मुहम्मद (स.) यांना वर्कापाशी घेऊन गेल्या. तेव्हा वर्का त्यांना म्हणाले,

"हे लोक तुम्हाला खोटे ठरवतील, तुमच्यावर अत्याचार करतील, देशातून बाहेर हाकलून देतील व तुमच्याशी युद्ध करतील." (इब्ने हिशाम, भाग १, पृष्ठ २५६)

वर्का बिन नोफल पुढे म्हणतात, किती चांगले झाले असते, मी त्या वेळी हजर असतो जेव्हा तुमचा समाज तुम्हाला स्वदेशातून बाहेर काढील. हे ऐकून पैगंबर मुहम्मद (स.) आश्चर्याने म्हणाले, "काय माझे जातीबांधव मला माझ्या देशातून बाहेर काढतील?"

वर्का उत्तरले, "आपण जी गोष्ट (प्रेषित्व) घेऊन आलात, ती घेऊन येणारा प्रत्येकजण अत्याचाराला बळी पडलेला आहे." (हदीस : बुखारी)

असे का घडते?

प्रत्येक युगाची स्थिती एकसारखी नसते. विभिन्न जातीच्या रीतिरिवाजात उघड अंतर असते. म्हणून असे म्हटले जाऊ शकते, त्यांना विरोध होण्याची कारणेदेखील अनेक राहिली असतील.

प्रत्येक पैगंबरांच्या विरोधाच्या कारणांचा शोध लावणे आज आमच्यासाठी कठीण आहे. तशी ही गोष्ट स्मरणात ठेवली पाहिजे की पैगंबरांवर अत्याचार करण्याची कारणेसुद्धा अनेक आहेत. परंतु पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या विरोधकांच्या स्थितीचे योग्य आकलन झाल्यास विभिन्न पैगंबरांवर झालेल्या अत्याचारांची कारणमीमांसा करणे कठीण होणार नाही. म्हणून सर्वप्रथम आम्ही पैंगंबर मुहम्मद (स.) यांच्या शत्रूंची स्थिती व पैगंबरांशी त्यांच्या व्यवहाराचा अभ्यास करू.

विरोध करणारे लोक

तीन वर्गांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांना विरोध केला होता. (१) अनेकेश्वरवादी, (२) यहुदी (ज्यू) आणि (३) मुनाफिक दांभिक या तिन्ही वर्गांच्या विरोधाची कारणे वेगवेगळी होती आणि त्यांच्या पद्धतीसुद्धा निरनिराळ्या होत्या.

अनेकेश्वरवादी

अरबस्तानातील मूळ रहिवासी मुशरिकच (अनेकेश्वरवादी) होते. यहुदी (ज्यू), इसाई (ख्रिश्चन) व आपल्या अंतरात्म्याच्या आवाहनावर 'सत्यधर्माचा' शोध करणाऱ्या लोकांशिवाय सर्व अरबस्तानवासी अनेकेश्वरवादी कदापि नव्हते. तर तौहीद (एकेश्वरत्व) ची कल्पना त्यांच्यात होती. प्राचीन अरब लोकांतील 'अल्लाह' शब्दाचा प्रयोग याचे प्रमाण होय. अरब लोक वास्तविकत: या शब्दाचा प्रयोग रचयिताच्या मूळ नामाच्या रूपातच करीत असत; परंतु या विश्वासाचा त्यांच्या दैनंदिन जीवनावर कोणताही प्रभाव नव्हता.

एकेश्वरत्वाची कल्पना मनात असूनदेखील ते मूर्तीपूजा करीत असत. त्यांना आपला उपास्य व संरक्षक समजत असत. आश्चर्य तर या गोष्टीचे आहे की विशुद्ध 'अल्लाह'च्या नावाने केली जाणारी उपासना सुद्धा कोणत्या ना कोणत्या मूर्तींच्या माध्यमाने केली जात असे. जसे अब्दुल मुत्तलिब यांनी नवस केला होता की, ते आपल्या एका मुलाला अल्लाहच्या नावाने बळी देतील आणि जेव्हा बळी देण्याची वेळ आली तेव्हा आपला सर्वांत लहान मुलगा अब्दुल्लाह (पैगंबर मुहम्मद (स.) यांचे वडील) यास काब्यातील सर्वांत मोठी मूर्ती 'हुबल' जवळ घेऊन गेले.

(इब्ने हिशाम, भाग १, पृष्ठ १६०-१६४)

जेव्हा त्यांना विचारले गेले की तुम्ही असे का करता? त्या मूर्तींमध्ये तुमचे रक्षण करण्याची अथवा तुम्हाला शिक्षा देण्याची कोणतीही शक्ती नाही. तेव्हा त्यांचे उत्तर होते,

"आम्ही त्यांची पूजा केवळ अल्लाहपर्यंत पोहचण्यासाठी करतो." अशाच प्रकारे सर्व मुशरिक (अनेकेश्वरवादी) आपल्या मूर्तीपूजनाचे हेच कारण सांगत असत आणि आजपर्यंतच सुद्धा हेच कारण सांगितले जात आहे.

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर अवतरलेल्या पहिल्याच वह्य (दिव्य प्रकटन) मध्ये ही गोष्ट स्पष्ट केली गेली होती की,

"अल्लाह एक आहे आणि तोच सृष्टीचा निर्माता आहे. मनुष्य अज्ञानी व निराश्रित आहे. वह्य मानव ज्ञानाचा स्त्रोत आहे."

परंतु तीन वर्षांपर्यंत हे सत्य उघडपणे प्रसारित केले गेले नाही, तर पूर्ण सावधगिरीने केवळ विश्वासपात्र लोकांपर्यंतच सीमित ठेवले गेले. अखेर कोठपर्यंत ही गोष्ट लपवून ठेवणे शक्य होते? तीन वर्षांनंतर आदेश मिळाला,

"प्रसारित करा जे काही सांगितले जात आहे."

"आणि भीती दाखवा आपल्या निकटवर्तियांना."

यानंतर पैगंबरांनी उघडपणे आपला संदेश प्रसारित करण्यास प्रारंभ केला.

(इब्ने हिशाम, भाग १, पृष्ठ २८०-२८१, तबूरी भाग ३, पृष्ठ ११६)

आदरणीय ईसा मसीह (येशू ख्रिस्त) ईश्वराचे पुत्र होते का?

या प्रारंभिक युगातील शिकवणी थोडक्यात अशा प्रकारे लिहिल्या जाऊ शकतात

१. वास्तविक ईश्वर केवळ एक अल्लाहच आहे.

● अल्लाह एकच आहे, तो सर्वांना निर्माण करणारा आणि सर्वांचे पालन करणारा आहे. अल्लाहकडे दुर्लक्ष करणारा मनुष्य जुलूम करणारा आणि द्रोही आहे. खरे पाहता माणसाला त्याच्याकडेच परतावयाचे आहे.

● जर अल्लाहचा इन्कार केला जात आहे तर इन्कार करणाऱ्यांनी विचार केला पाहिजे की, पृथ्वी व आकाशाची रचना कशी झाली? पर्वत कसे स्थिर झाले, आकाशातून पाण्याचा वर्षाव कशा प्रकारे होतो?

● त्यांना अन्न कोठून प्राप्त होते? आकाशातून पावसाचा वर्षाव करणारा अल्लाह आहे. तोच जमिनीतून खाद्यपदार्थ उत्पन्न करतो. तरीसुद्धा, हे अनेकेश्वरवादी अल्लाहशी कृतघ्न बनून मूर्त्यांची पूजा का करतात?

● अल्लाहने त्यांना निर्माण केले, हिरवळ त्याने उत्पन्न केली आणि सर्व कामे त्याच्या आज्ञेने होतात. सत्कर्म करून व अल्लाहला सर्वोच्च मानून त्याची उपासना करणाऱ्यांनाच सफलता प्राप्त होईल.

● अल्लाहने मनुष्याला डोळे दिले की, सत्य-असत्य त्याने ओळखू शकावे. मनुष्य पाहत नाही काय की मूर्ती त्याला लाभही पोचवू शकत नाहीत आणि नुकसानसुद्धा पोचवू शकत नाहीत. जर स्वत:ला माहीत नसेल तर इतरांना विचारून सत्य गोष्ट माहीत करून घेण्यासाठी अल्लाहने त्याला जीभसुद्धा दिलेली आहे.

२. अनाथ व गरजूंना सहाय्य करा.

● अल्लाह त्या लोकांना सहाय्य करतो आणि त्यांच्यावर आपली कृपादृष्टी ठेवतो जे दान देतात आणि अल्लाहचे भय बाळगतात. या उलट कंजूषपणा करणारे आणि अल्लाहच्या कृपा प्रसादासाठी कृतघ्नता व्यक्त करणाऱ्यांचे जीवन अल्लाह कठीण बनवितो आणि परलोकात त्यांची संपत्ती त्यांना उपयोगी पडणार नाही.

● दुसऱ्यावर आरोप करणाऱ्या आणि संपत्ती गोळा करण्यात गुंतलेल्या लोकांचा धिक्कार असो. ते असे का समजतात की त्यांची संपत्ती सदैव टिकेल? खरे पाहता ते विनाशाकडे धाव घेत आहेत, ज्यापासून त्यांना कोणीही वाचवू शकणार नाही.

● तुम्ही अनाथांचा सत्कार करीत नाही, निर्धनांना भोजन देत नाही. जे काही प्राप्त होते स्वत: खाऊन मौज उडविता, धन गोळा करता, अंतिम दिनीच तुम्हाला अक्कल येईल जेव्हा

नरक तुम्हाला गिळून टाकण्यासाठी तोंड उघडून तयार असेल; परंतु तेव्हा पश्चात्ताप करण्याशिवाय काहीही प्राप्त होणार नाही.

● अल्लाहचा इन्कार करणारे व गरिबांना जेऊ न घालणाऱ्यांचा त्या अंतिम दिनी कोणीही सहाय्यक असणार नाही. नरक त्यांच्या निवासाची जागा बनेल.

३. परलोक व जाब विचारणीचा दिवस सत्याधिष्ठित

● त्यांना सांगा की ते आमच्याकडे (अल्लाहकडे) परत येतील आणि त्यांना आपल्या कर्मांचा हिशेब द्यावा लागेल. इन्कार करणारे त्या दिवशी अत्यधिक कष्ट सहन करतील.

● आमच्यासमोर हजर होण्याच्या दिवशी त्यांचे सर्व भेद उघडे पडतील. त्या दिवशी त्यांचे उपास्य व त्यांचे धन-वैभव त्यांच्या कोणत्याही उपयोगी पडणार नाही.

● आकाश चुरा चुरा होणाऱ्या त्या दिवशी, हे सत्य नाकारणारे काय करतील?

● पैगंबर मुहम्मद (स.) यांची जबाबदारी केवळ त्यांना सावध करणे होय आणि त्यांना त्यांच्या स्थितीत सोडून द्या. मग त्यांच्याशी करावयाचा व्यवहार आम्ही स्वत: पाहून घेऊ मृत्यूनंतर आमच्यासमोर हजर झाल्यावर त्यांना कठोर यातना सहन करण्यासाठी तयार राहिले पाहिजे. या सत्याचा इन्कार करणारांशी केलेला वायदा त्या कठोर यातनांचा दिवस निश्चित आहे. तो अवश्य येईल.

या आहेत पैगंबरांच्या प्रारंभिक युगातील वह्य (ईशसंदेश) मधील शिकवणी. यात मुख्यत: चार गोष्टींवर भर दिला गेला आहे.

१. मूर्तींची पूजा व्यर्थ कार्य आहे.

२. भक्ती व आज्ञापालनाचा अधिकारी तर केवळ अल्लाहच आहे.

३. धन गोळा करण्यापेक्षा श्रेष्ठतर हे आहे की ते अनाथ व गरिबांसाठी खर्च केले जावे.

४. अल्लाहचा इन्कार करणाऱ्यांचा शेवट फार वाईट होईल.

कुरैश लोकांचा विरोध का?

या शिकवणी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या प्रेषित्त्वाच्या काळात कुरैश लोकांच्या विचारसरणीच्या अगदी उलट होत्या. पैगंबरांशी कुरैश लोकांच्या द्वेषपूर्ण विरोधाचे रहस्यसुद्धा हेच आहे. त्याची धार्मिक, नैतिक व सामाजिक कारणेसुद्धा आहेत.

१. धार्मिक कारण

एका ईश्वराकडे बोलाविणे व मूर्त्यांचा विरोध केल्याने त्यांच्या पूर्वजांचे खंडन होत असण्याचे स्पष्ट होत होते. याच विचाराने मक्कामधील अनेकेश्वरवाद्यांची डोकी भडकली

होती आणि कोणताच तर्क (समर्पक उत्तर) न मिळाल्याने ते हेच सांगत असत की आमच्या मूर्तींची निभर्त्सना केली जात आहे. आम्हाला मूर्ख व नरकाचे इंधन म्हटले जात आहे. याशिवाय आमच्या पूर्वजांचे व वडीलधाऱ्या मंडळीचे वाईट चित्र प्रस्तुत केले जात आहे.

हे होते अनेकेश्वरवाद्यांचे आरोप, अत्यंत व्यर्थ व निरर्थक गोष्टीलासुद्धा सहजपणे न सोडणे हा मानवाचा सहज-स्वभाव आहे. जर एखादे काम निरंतर दहा-वीस वर्षांपासून केले जात असेल तर ती गोष्टच निराळी त्या गोष्टीचा पूर्वापार परंपरा म्हणून स्वीकार केला जातो. जगातील सर्व सिद्धान्त व कायदे चुकीचे सिद्ध होऊ शकतात; परंतु जीवनाच्या या परंपरेला चुकीचे समजणे माणसाच्या कल्पनेपलिकडील गोष्ट होय. यात कोणत्याही प्रकारच्या शंकेला तो सहन करण्यास तयार नाही. स्वभावत: हेच अरबस्तानात घडले.

दहा-वीस वर्षे नव्हे तर अनेक शतकांपासून अरब लोक मूर्तींची पूजा करीत होते. म्हणून हे अशक्य नव्हते की या नवीन आवाजाने त्यांना कष्ट होऊ नये. परंतु असे वाटते की, या बाबतीत त्यांना गांभीर्याने विचार करण्याची गरज भासली नाही. जास्तीत जास्त त्यांनी उपहास करणे व नाविन्याची टिंगल उडविण्याचे काम केले. (तबूरी भाग ३, पृष्ठ ११०८)

निर्धन व साधनहीन मुस्लिम जेव्हा अनेकेश्वरवाद्यांच्या जवळून जात असत तेव्हा ते उपहासाने म्हणत असत, ''हेच ते आहेत जे आम्हा लोकांत अल्लाहचे खरे ज्ञान बाळगणारे आहेत.'' परंतु जेव्हा इस्लामचा आवाज आम झाला आणि उच्च कुटुंबातील तरुण व गुलामांनी इस्लामचा स्वीकार केला तेव्हा त्यांच्या लक्षात आले की मामला बिघडलेला आहे. आता याकडे दुर्लक्ष करून भागणार नाही, अन्यथा फार मोठे नुकसान होईल. हाच विचार करून त्यांनी तीव्र विरोधाची तयारी केली.

२. नैतिक कारण

कुरैश लोकांची आजीविका व्यापारावर आधारित होती. दानशूरता, आतिथ्य-सत्कार, लाचार लोकांना सहायता वगैरेंना जरी त्यांच्या लोककथांमध्ये खूप महत्त्व होते; परंतु ज्या युगाचा आम्ही उल्लेख करीत आहोत त्यात हे गुण केवळ त्यांच्या कथांपुरतेच उरले होते. भांडवलशाहीचे सर्व दुर्गुण त्यांच्यात प्रकट होण्यास सुरवात झाली होती. काही प्रमुख व्यक्तींजवळ व कुटुंबात व्यापार उदिमाने खूप संपत्ती गोळा झाल्यामुळे धार्मिक व नैतिक क्षेत्रात पतन आले होते. व्याजाचा धंदा देशात सर्वत्र पसरला होता आणि अत्याचाराचे वादळ सर्व भागात घोंघावत होते. गरीब व अनाथांच्या संपत्तीवर अवैध रूपाने ताबा मिळविण्यात कोणताही संकोच केला जात नसे. 'हल्फुलफुजूल' ठराव वास्तविकत: याच परिस्थितीचा परिणाम होय.

अल-मसअदी हल्फुलफुजूलसंबंधी म्हणतो, ''अज्ञानकाळात यमनच्या एका व्यापाऱ्याने 'आस बिन वाइलला' काही सामान विकले. आसने किंमत देण्यापासून

वाचण्यासाठी टाळाटाळ सुरु केली. अखेरीस व्यापाऱ्याने क्रोधित होऊन आसला निंदाजनक काव्य लिहून पाठविला. उक्त काव्य जुबैर बिन अब्दुल मुत्तलिब यांच्या दृष्टीखालून गेला तेव्हा त्यांना फार दु:ख झाले. त्यांनी ताबडतोब बनू हाशिम, बनू मुत्तालिब, असद, जोहरा आणि तमीमसारख्या टोळ्यांतील निष्पक्ष व्यक्तींना अब्दुल्लाह बिन जदआन यांच्या घरी बोलावून 'हल्फुलफुजूल' या कराराचा पाया घातला. त्यांनी करार केला की, आमच्यापैकी प्रत्येकजण अत्याचार करणाऱ्याविरुद्ध अत्याचारपीडिताला सहाय्य करील, मग अत्याचारी आपला असो की परका, त्याच्याकडून हक्क मिळवुन दिल्याशिवाय शांत बसणार नाही.''

(इब्ने हिशाम, भाग १, पृष्ठ १४१)

पुराव्याअंती असे कळले की पैगंबर मुहम्मद (स.) यांनीसुद्धा या करारात भाग घेतला होता. खुद्द पैगंबर म्हणतात, ''अब्दुल्लाह बिन जिदानच्या घरी केल्या गेलेल्या करारात मी सहभागी होतो आणि जर त्या कराराविरुद्ध वागण्यासाठी मला तांबडा उंट जरी दिला गेला तरी मी पाठ फिरविणार नाही, आणि जर एखाद्या अत्याचारपीडिताने माझ्याकडून मदत मागितली तर मी त्याला अवश्य मदत करीन.''

(इब्ने हिशाम, भाग १, पृष्ठ १४२)

या घटनेवरूनसुद्धा कुरैश लोकांच्या नैतिक पतनाची कल्पना येते.

जेव्हा मुस्लिम देशत्याग करून हब्शाला (ॲबिसीनियाला) निघून गेले, तेव्हा कुरैश लोकांनी त्यांना परत आणण्यासाठी एक शिष्टमंडळ पाठविले. बादशाहने मुस्लिमांना बोलावून त्यांना त्या नवीन धर्माविषयी विचारले, ज्याचा त्यांनी अंगिकार केला होता. त्यांच्यापैकी जाफर बिन अबी तालिब यांनी बादशाहसमोर एक वक्तव्य दिले, ज्यात त्यांनी इस्लामपूर्वीच्या आपल्या जीवन व इस्लामी शिकवणींची व्याख्या करताना सांगितले, ''आम्ही अज्ञानाच्या अंधारात सापडलो होतो, मूर्तींचे पूजन करीत होतो, मृत प्राणी खात होतो, दुष्कर्म करीत होतो, स्वजनांची हत्या करीत असू, शेजाऱ्यांचा हक्क मारीत असू, आमच्यापैकी शक्तिमान, निर्बलांचे दमन करीत असत, चारित्र्यहीनतेचे जीवन आम्ही जगत होतो. परंतु अल्लाहने आमच्यापैकी एक रसूल (पैगंबर) पाठविला, ज्यांचे उच्चवंशीय असणे स्पष्ट होते व ज्यांची सत्यप्रियता, दानशूरता सर्वमान्य होती. त्यांनी केवळ एका ईश्वराची भक्ती व आज्ञापालनाचे आवाहन केले. त्यांनी आम्हाला शिकवण दिली की, आम्ही व आमचे पूर्वज ज्या मूर्तींची पूजा करीत होतो, त्यांना आम्ही सोडून द्यावे, खरे बोलावे, वचनांचे पालन करावे, लोकांशी चांगला व्यवहार करावा, शेजाऱ्यांशी चांगला व्यवहार करावा, दुष्कर्म व हत्येपासून अलिप्त राहावे. त्यांनी अपकृत्य करणे व खोटे बोलण्यापासून रोखले आणि पतिव्रता स्त्रियांवर आरोप करण्याची मनाई केली.''

(इब्ने हिशाम, भाग १, पृष्ठ २५९-२६०)

हे आहे त्या युगाचे वास्तविक चित्र, जेव्हा आदरणीय मुहम्मद (स.) यांना पैगंबर बनविले गेले होते. म्हणून पवित्र कुरआनने उपाशी माणसाला जेऊ घालणे व अनाथांचा मान राखण्याची आज्ञा दिली, तेव्हा अनाथ व दुर्बलांचे शोषण करणाऱ्या कंजूस लोकांसाठी ही गोष्ट असह्य होती. त्यांनी पाहिले की कुरआनच्या या शिकवणीमुळे आमचा मान-सन्मान व प्रतिष्ठा धुळीला मिळत आहे. म्हणून त्यांनी या स्वराला 'घाम गाळून कमविलेल्या संपत्तीला समाजातील बेकार लोकांत वाटून स्वत:ला निर्धन बनविणारा' स्वर म्हटले. यावरून आम्ही म्हणू शकतो की पैगंबरांना केला गेलेला विरोध निव्वळ धार्मिक कारणासाठीच नव्हता तर याच्यापाठीमागे आर्थिक कारणसुद्धा होते.

३. सामाजिक कारण

अरब समाजाची निर्मिती टोळ्यांच्या आधारे झाली होती. प्रत्येक टोळी एक एक युनिटप्रमाणे होती. टोळी व त्यातील लोकांच्या मामल्यासंबंधी संपूर्ण टोळी जबाबदार असे. त्यामुळेच चांगल्या व वाईट स्थितीत अथवा अन्य बाबतीत टोळीसाठी आपले प्राणसुद्धा अर्पण करण्यास प्रत्येकजण तयार असे. टोळीच्या स्वार्थाच्या तुलनेत ते आपल्या व्यक्तिमत्वाला काहीही महत्त्व देत नसत. त्यांच्यापैकी प्रत्येकजण मुत्तलिबी, हाशिमी अथवा कोणी अन्य असू शकत होता; परंतु टोळी सोडून व्यक्तीचे कोणतेही वेगळे महत्त्व नसे. टोळीच्या बहुमताविरुद्ध जाणे केवळ टोळीचा निरादरच नव्हे तर पापाचे कृत्य मानले जात असे. टोळीशी विद्रोह करणाऱ्याचा शेवट नेहमी एकच असे. टोळीतून बहिष्कार करणे मग त्याला कुठेतरी लांब निघून जाणे भाग पडत असे. तो एखाद्या अन्य टोळीच्या आश्रयाला जात असे. व्यक्तीचे महत्त्व समाजात मान्य नव्हते, तिचे अस्तित्व टोळीच्या अस्तित्वात विलीन होत असे. जर एखाद्या टोळीत तो विलीन झाला नाही. तर त्याचा अर्थ असा झाला की, त्याच्या प्राण व वित्ताची जामिनकी नाही आणि प्रत्येकासाठी त्याची संपत्ती हिरावून घेणे व त्याचे प्राण घेणे वैध. या नियमांचे केवळ सामाजिक महत्त्वच नव्हते तर त्याचे धार्मिक महत्त्वसुद्धा होते. परलोकाची त्यांच्यात कोणतीच कल्पना नसल्यामुळे त्यांच्यात 'धर्म व जग' केवळ इतकेच होते की कोणत्याही परिस्थितीत टोळी व तिच्या सरदाराच्या आज्ञेचे पालन केले जावे. परंतु इस्लामी शिकवणी याच्या अगदी विपरीत आहेत. त्यानुसार प्रत्येक व्यक्तीची त्याच्या स्वत:संबंधी चौकशी होईल आणि प्रत्येकजण आपल्या कर्मासाठी स्वत: जबाबदार असेल.

'कोणताही ओझे उचलणारा अन्य एखाद्याचे ओझे उचलणार नाही.' जर एखाद्याने चूक केली तर त्याला जबाबदार तो स्वत: आहे, त्याचा परिवार अथवा त्याची

टोळी नव्हे. मक्कावासी नवयुवक जेव्हा इस्लामचा स्वीकार करू लागले तेव्हा तेथील टोळ्यांचे मजबूत किल्ले डळमळू लागले. दुसऱ्या शब्दांत प्रत्येक टोळीला व प्रत्येक कुटुंबाला तितक्याच व्यक्तींचे नुकसान झाले, जितक्या त्यांच्या सदस्यांनी इस्लामचा स्वीकार केला होता. अनुभवी म्हाताऱ्या मंडळींनी अंदाज लावला की हे तरुण आता आपल्या कुटुंबासाठीही तलवार उचलणार नाहीत आणि ते टोळीच्या शत्रूशीही लढणार नाहीत.

४. राजनैतिक कारण

इस्लामच्या पहिल्या चरणातच इस्लामी आंदोलनाच्या राजनैतिक महत्त्वाला लोकांनी ओळखले असेल हे संभवतीत आहे. परंतु दीर्घकाळापर्यंत ते या भ्रमात राहू शकत नव्हते. त्यांच्या लवकरच लक्षात आले की इस्लामच्या प्रभुत्वाचा अर्थ आपली सत्ता, आपली प्रतिष्ठा, आपले राज्य व आपल्या प्रभुत्वाचा अंत! इस्लामची माळ गळ्यात घालणारी प्रत्येक व्यक्ती; टोळी व टोळीच्या सरदाराची एक तलवार कमी करते आहे व इस्लामचे आवाहक पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या शक्तीत वाढ करते आहे. जर कोणत्याही अडथळ्याविना ही स्पर्धा अशीच चालू राहिली तर आज नाही तर उद्या, आम्हाला स्वेच्छेने अथवा अनिच्छेने पैगंबर मुहम्मद (स.) यांची आज्ञा पाळणे भाग पडेल, हे टोळ्यांच्या सरदारांनी ओळखले.

मक्केत राहणाऱ्या लोकांमध्ये कुरैशची संख्या फार मोठी होती. सर्व कुरैशांचे हर्ब बिन मलिक नामक एकच आजोबा होते, जे 'कुरैश' या उपाधीने प्रसिद्ध होते. तरीसुद्धा काळाबरोबर त्यांच्यात आपापसात भांडण-तंटे उभे राहिले होते. उदाहरणार्थ, हर्बला दोन मुलगे अदी व मुर्रा नावाचे होते. त्यांची संतती बनू अदी व बनू मुर्रा एकमेकांचे शत्रू होते. मुर्राला दोन मुले होती - किलाब व युक्सा. किलाबला दोन मुलगे, कुसई व जोहरा नावाचे होते. मखजूम युक्साचे अपत्य होते. बनू जोहरा व बनू कुसई एकीकडे व बनू मखजूम दुसरीकडे राहून आपापसात युद्ध करीत. कुसई बुद्धिमान व सरदार होते. त्यांनी आपली बुद्धिमत्ता, साहस व सरदारीचा उपयोग करून आपापसात भांडत राहणाऱ्या कुरैश जमातीला एका छत्राखाली आणले. त्यांच्या सरदाराकीला सर्व कुरैश लोकांनी स्वीकृती दिली. कुसईनंतर जमातीची सरदारकी त्याचा मुलगा अब्दे मुनाफकडे आली. अब्दे मुनाफ आपल्या वडिलाप्रमाणे लायक व बुद्धिमान होता. त्याच्याविरुद्ध बंड करण्याचे कोणालाही धाडस झाले नाही. परंतु त्यांची दोन मुले हाशिम व अब्दे शम्स यांच्या संततीमध्ये पुन्हा संघर्ष सुरू झाला. बनू अब्दे शम्स बनू हाशिमला दाबून टाकण्याच्या पवित्र्यात होता. हाशिमचा मुलगा अब्दुल मुत्तलिब (शैबा) फार लायक होता. म्हणून त्यांच्या मृत्यूपर्यंत बनू अब्दे शम्स याची कोणतीही चाल

यशस्वी होऊ शकली नाही. परंतु त्यांच्या मृत्यूनंतर पतनाची चिन्हे स्पष्ट दिसू लागली. बनू हाशिमऐवजी बनू अब्दे शम्सच्या हर्ब बिन उमैयाला सरदार मानले गेले. अब्दुल मुत्तलिबचे पुत्र अबू तालिब (माननीय अलीचे पिता, ज्यांचे वास्तविक नाव अब्दे मुनाफ होते) यांची बनू हाशिमचे सरदार म्हणून निवड झाली. ते स्वच्छ व खुल्या मनाचे व्यक्ती होते. त्यांची आर्थिक स्थिती बिकट होती. त्यांच्यावर मोठ्या कुटुंबाचे ओझे होते. म्हणून बनू हाशिमना पहिल्यासारखे स्थान प्राप्त होऊ शकले नाही. पैगंबर (स.) याच अबू तालिबचे पुतणे होते. जोपर्यंत अब्दुल मुत्तलिब जिवंत राहिले, त्यांनी या अनाथ नातवाला (पैगंबर मुहम्मद (स.)) मोठ्या प्रेमाने पाळले व त्यांचे पोषण केले. अब्दुल मुत्तलिब यांच्या निधनानंतर पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या संगोपनाचा भार अबू तालिबवर येऊन पडला.

ही होती ती कारणे ज्यांच्यामुळे पैगंबरांना टोळ्यातील संघर्ष व वैमनस्याला तोंड द्यावे लागले.

पैगंबर मुहम्मद (स.) यांचे सर्वांत मोठे शत्रू म्हणून अबू सुफियान व अबू जहल समोर आले. सुफियान बनू हाशिमचा सर्वांत मोठा शत्रू हर्ब बिन उमैया बिन अब्दे शम्सचा मुलगा होता. अबू जहल मखजूमीपैकी मुर्रा बिन काबचा पौत्र मखजूमच्या संततीपैकी होता. मखजूमच्या मृत्यूनंतर या बनू मखजूम परिवाराची सरदारकी वलीद बिन मुगीरा (इस्लामी सेनेचे मान्यवर सेनापति खालिद बिन वलीदचे वडील) यांच्याकडे आली. वलीद यांच्या मृत्यूनंतर बनू मखजूमची सरदारकी वलीदचा पुतण्या अबू जहलला मिळाली. वलीद वयस्कर व अपेक्षतः सज्जन होता. याउलट अबू जहल तरुण, भावुक, पाषाण हृदयी व कोणालाही क्षमा न करणारा होता. त्याचे मूळ नाव अम्र आणि उपाधि अबू जहल होती. त्याची योग्यता व त्याचा दूरदर्शीपणा सर्वमान्य होता. मक्केच्या विधीमंडळ (दारुन्नदवह) नियमानुसार कोणीही चाळीस वर्षांपेक्षा कमी वयाचा तिचा सदस्य बनू शकत नव्हता. परंतु मक्कावसीयांनी अम्र बिन हिशाम (अबू जहल) याची तीस वर्षांच्या वयातच दारुन्नदवहचा सभासद म्हणून निवड केली, ज्यावरून अबू जहलच्या दूरदर्शीपणा व बुद्धिमत्तेची कल्पना केली जाऊ शकते. बनू मखजूम यांचे कुरैश जमातीशी दीर्घकालीन शत्रुत्व होते; परंतु कुसई, अब्दे मुनाफ, हाशिम व अब्दुल मुत्तलिब यांच्या काळात उघड विरोध करू शकले नाहीत. अब्दुल मुत्तलिबच्या मृत्यूनंतर बनू हाशिम निर्बळ झाले व बनू मखजूम आपल्या सरदारकीची स्वप्ने पाहू लागले.

जमातीच्या सरदारकीच्या इच्छुक व्यक्तीसाठी त्या काळात हे आवश्यक होते की, ती व्यक्ती दानशूर, आतिथ्य-सत्कार करणारी व खुल्या मनाची असावी. प्रत्येक वर्षी, प्रत्येक प्रसंगी, प्रत्येक क्षेत्रातील लोक मक्केत एकत्र होत होते. लोकांत आपला प्रभाव

वाढविण्याची इच्छा बाळगणारा प्रत्येकजण त्या काळात दानशूरपणा व आतिथ्य-सत्कारांत एक दुसऱ्यावर बाजी मारण्याचा प्रयत्न करीत असे. ही पाहुणी मंडळी जेव्हा आपल्या क्षेत्रांत परत जात असत तेव्हा आपल्या पाहुणचार करणाऱ्या दानशूर व्यक्तीची प्रशंसा करीत, कवी त्यांच्या स्तुतीवर कविता लिहीत, तीर्थयात्रेकरू त्या व्यक्तीची दानशूरता, त्याच्या आतिथ्य-सत्काराच्या निरनिराळ्या कथा प्रसिद्ध करीत. व्यापारी त्याचे गुणगान अविरतपणे करीत अशा प्रकारे त्या व्यक्तीची प्रसिद्धी देशाच्या काना-कोपऱ्यात पसरत असे.

बनू मखजूम कुरैश जमातीची सरदारकी प्राप्त करण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होते; परंतु हर्ब बिन उमैयाच्या योग्यता व क्षमतेपुढे त्यांना आपल्या सफलतेविषयी शंका वाटू लागली. हर्बच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा अबू सुफियान जरी बनू मखजूमचा सरदार निवडला गेला तरी त्याच्यात आपल्या वडिलाप्रमाणे बुद्धिमत्ता व योग्यता नव्हती. म्हणून दुसरे बनू मखजूम अबू सुफियानपेक्षा पुढे गेले. प्रथम वलीद बिन मुगीरा व नंतर अबू जहल कुरैशचे सरदार मानले गेले.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी जेव्हा नुबुवत (प्रेषित्व) चा दावा केला तेव्हा कुणीतरी अबू जहलला असा प्रश्न केला, ''अबू रकम ! मुहम्मद जो काही दावा करीत आहेत, तो तुम्ही ऐकला नाही काय? यासंबंधी तुमचा काय विचार आहे?''

या प्रश्नाचे उत्तर म्हणून अबू जहल याने जे काही सांगितले त्यात कौटुंबिक विद्वेष दिसून येतो. तो म्हणतो, ''मित्र ! ऐकण्यासाठी काय आहे? आम्ही अब्दे मुनाफशी प्रत्येक उच्च पद प्राप्त करण्यासाठी संघर्ष केले. जेव्हा त्यांनी आतिथ्य-सत्कार केला तेव्हा आम्हीसुद्धा केला. त्यांनी दुर्बलांना सहाय्य केले तर आम्हीसुद्धा केले. त्यांनी लोकांचा भार उचलला तर आम्हीसुद्धा उचलला आणि अशा प्रकारच्या स्पर्धेत आमचा खांदा त्यांच्याशी भिडला (आम्ही त्यांच्यापुढे जाणार होतो) की पहा त्यांनी एक नवीन रस्ता काढला आहे. त्यांनी दावा केला आहे की आमच्यात पैगंबरांचा जन्म झाला आहे. ज्याला आकाशातून वह्य (ईशसंदेश) प्राप्त होते. अशा प्रकारची गोष्ट आम्हाला माहीत नाही. अल्लाहची शपथ ! आम्ही त्याच्यावर कधीही श्रद्धा बाळगणार नाही आणि त्याचे म्हणणेही ऐकणार नाही.''

(इब्ने हिशाम भाग १, पृष्ठ ३३७ ते ३३८)

अर्थात अबू जहलच्या मतानुसार बनू अब्दे मुनाफची एक व्यक्ती या प्रेषित्वाच्या दाव्याने स्वतःच्या टोळीच्या पदाला बहाल करणे व शत्रू टोळीच्या पदाला खाली खेचू इच्छित होती. अशा प्रकारे तो मनुष्य कोणत्याही स्थितीत त्या पैगंबरांवर श्रद्धा आणू शकत नाही.

तात्पर्य, पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या विरोधापाठीमागे सर्व कारणे कार्यरत होती. लोकांनी पैगंबरांचा विरोध धार्मिक पद्धतीचा सुरु ठेवला कारण हा मूर्तींची निंदा करतो, पूर्वजांना मार्गभ्रष्ट व नरकवासी म्हणतो. स्वार्थी लोकांनी पैगंबरांचा विरोध सुरु केला कारण त्यांच्या अत्याचार व शोषणाला पैगंबरांनी वाईट म्हटले आणि निर्बळांच्या सहाय्य व दान-पुण्याला प्रोत्साहन दिले. आपली प्रतिष्ठा व मान-सन्मान समाप्त होण्याच्या भीतीने ते लोक पैगंबरांचे विरोधक बनले. आपले शत्रू बनू हाशिमपैकी एका नवयुवकासमोर नतमस्तक होण्याच्या भावनेने सुद्धा त्यांना विरोध करण्यासाठी उत्तेजित केले. या व्यतिरिक्त इतर काही कारणांचा उल्लेख ही अल्लामा शिबली नोमानी यांनी 'सीरतुन्नबी' या आपल्या ग्रंथाच्या प्रथम भाग पृष्ठ २१२-२१४ वर केला आहे; परंतु वास्तविकत: ती सर्व कारणे नंतर निर्माण झाली होती. प्रारंभिक काळात उपरोक्त कारणेच विरोधासाठी प्रेरक बनली.

कुरैशचे प्रतिनिधी, अबू तालिबसमोर वेळोवेळी हेच पुरावे प्रस्तुत करीत.

सुरवातीला पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या प्रेषित्व व संदेशाला समाजातील सरदारांनी इतके अधिक महत्व दिले नव्हते. (तबरी भाग ३, पृष्ठ ११८०, उमवी खलीफा अब्दुल मलिक बिन मरवानला उर्वा बिन जुबैरचे पत्र.) परंतु जेव्हा त्यांनी समस्येच्या महत्त्वाचा अंदाज लावला तेव्हा त्यांचे डोळे उघडले. ते आपापसांत वाढीस लागलेल्या या मानवी जमातीपासून प्रतिरक्षेबाबत सल्लामसलत करू लागले. शेवटी कुरैशी सरदारांना अबू तालिबनी संतुष्ट करून परत पाठविले. परंतु पैगंबरांनी आपला संदेश देण्याचे कार्य निरंतर सुरू ठेवले.

म्हणून पहिल्यापेक्षा अधिक लोक पैगंबरांच्या आवाहनाचा स्वीकार करू लागले. यामुळे कुरैश अधिकच भडकले. त्याची सहनशीलता शिगेला पोहचली. आणखी एक शिष्टमंडळ अबू तालिबजवळ गेले आणि त्यांनी धमकी दिली की जर मुहम्मद (स.) यांनी ते काम बंद केले नाही तर त्यांच्याविरुद्ध शक्तीपरीक्षण होईल आणि जर अबू तालिब यांनी प्रतिकार केला तर त्यावेळेपर्यंत युद्ध चालू राहील, जोपर्यंत एकूण एक गट संपत नाही.

याचा काही विशेष परिणाम झाला नाही, तेव्हा ते एक दुसरी योजना घेऊन अबू तालिब यांच्या भेटीस आले. कुरैशच्या उच्च परिवारातील एका सच्चरित्र युवकाला अबू तालिब यांनी आपला पुत्र म्हणून घ्यावे व मुहम्मदला त्यांच्या हवाली करावे असा प्रस्ताव मांडला. अबू तालिबनी त्यांची मागणी स्पष्टपणे धुडकावून दिली. शिष्टमंडळ, अबू तालिबनी कोणतीही मागणी मान्य केली नाही, म्हणून परतले.

याचबरोबर पैगंबर व त्यांच्या साथीदारांना तीव्र विरोध सुरु केला.

दमनचक्र

दमनचक्र सुरु केल्यानंतर ताबडतोब कुरैशांनी निर्णय घेतला की प्रत्येक टोळी व परिवार आपल्यापैकी मुस्लिम होणाऱ्या लोकांवर जुलूम करील येथेपावेतो की त्यांनी इस्लामकडे पाठ फिरवावी.

अबू जहल शारीरिक कष्ट देण्याशिवाय मानसिक कष्ट पोहचविण्यासाठी मानसशास्त्रीय अस्त्रांचासुद्धा उपयोग करीत असे. जर एखाद्या प्रतिष्ठित व श्रेष्ठ माणसाने इस्लामचा स्वीकार केला तर अबू जहल त्याला विभिन्न प्रकारे अपमानित करण्याचा प्रयत्न करीत असे व म्हणत असे, ''आम्ही तुझ्या मूर्खपणाचा शेवट करू तुला अत्यंत अपमानित करू. ते अशासाठी की तू आपल्या त्या पूर्वजांच्या धर्माचा त्याग केला आहे, जे तुझ्यापेक्षा अधिक सक्षम व समंजस होते.'' जर इस्लाम स्वीकारणारा व्यापारी असला तर अबू जहल त्याला धमकी देत असे व म्हणत असे, ''आम्हीही पाहून घेऊ की तू आपला माल येथे कसा विकतो ते आणि तुझी संपत्ती नष्ट करूनच आम्ही शांत बसू.''

आणि जर इस्लाम स्वीकारणारी व्यक्ती दुर्बल व निर्धन असेल तर अबू जहल खूप शारीरिक कष्ट देत असे व दुसऱ्यांना असे करण्यास प्रोत्साहन देत असे. (इब्ने हिशाम)

म्हणूनच शारीरिक कष्ट त्या मुस्लिमांना दिले गेले जे जवळचे होते अथवा इस्लाम स्वीकारल्यामुळे टोळीतून हाकलले गेले होते.

खब्बाब बिन अरत्त (रजि.), बिलाल बिन रबाह (रजि.), अबू यासर (रजि.), अम्मार बिन यासिर (रजि.), सुहैब रूमी (रजि.) वगैरे दासांपैकी न जाणो कितीजण आपल्या मालकांच्या दमन-चक्राला बळी पडले. या अत्याचारांच्या कथांचा अभ्यास करताना हृदयाचा थरकाप उडतो. परंतु इतके अत्याचार सहन करूनसुद्धा त्यांच्यापैकी एकाचेदेखील पाय डळमळले नाहीत. त्यांच्यापैकीच बहुतेकांना माननीय अबू बकर (रजि.) व अन्य श्रीमंत मुस्लिमांनी खरेदी करून मुक्त केले. परंतु ज्यांना अशा प्रकारे मुक्त केले गेले नाही ते दीर्घकाळपर्यंत अत्याचाराला बळी पडले.

या निर्धन गुलामांची स्थिती फार शोचनीय होती. ते आपल्या मालकांची मिळकत होते. त्यांच्याशी वाटेल तसा व्यवहार करण्याचा मालकांना हक्क होता; परंतु याचा अर्थ असा नव्हे की, अन्य मुस्लिमांनी स्थिती चांगली होती. तेसुद्धा अत्याचारापासून वाचू शकले नाहीत. माननीय उस्मान बिन अफ्फान (रजि.) जरी बनू उमैया टोळीतील श्रीमंत व्यक्ती होते तरी त्यांचे चुलते अम्र बिन आस यांना ते दोरीने बांधून मारीत असत.

सईद बिन अम्र हे बनू अदी टोळीपैकी होते. माननीय उमर (रजि.) यांची बहीण फातिमाचा त्यांच्याशी विवाह झाला होता. या पतिपत्नींनी इस्लामचा स्वीकार केल्यामुळे माननीय उमर (रजि.) तलवार घेऊन त्यांना ठार करण्यास तयार झाले होते. जेव्हा त्यांच्या बहिणीने बचाव केला तेव्हा त्यांनासुद्धा घाव बसला.

अशाच प्रकारे अब्दुल्लाह बिन असद, अबू जर गिफ्फारी व जुबैर बिन अब्बास सारख्या प्रतिष्ठित व्यक्तीसुद्धा दमनचक्राला बळी पडल्या.

मुस्लिम व्यापाऱ्यांना अबू जहलने धमकी दिली होती की आम्ही तुमच्याशी व्यापार करणार नाही. यासाठी उदाहरण म्हणून माननीय अबू बकर (रजि.) यांची घटनाच पुरेसी आहे. जेव्हा माननीय अबू बकर (रजि.) यांनी इस्लाम धर्म स्वीकारला तेव्हा त्यांच्याजवळ ४० हजार दिरहम होते; परंतु तेरा वर्षांनंतर माननीय अबू बकर सिद्दीक (रजि.) जेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) बरोबर मदिन्याला निघाले तेव्हा त्यांच्याजवळ फक्त ५०० दिरहम उरले होते. (इब्ने साद, भाग ३, पृष्ठ १२२)

यात शंका नाही की त्यांनी इस्लामसाठी मोठ्या आर्थिक सेवा केल्या आहेत. कित्येक अत्याचारपीडित गुलामांना त्यांनी खरेदी करून मुक्त केले. या गुलामांचे मालक तोंडाला येईल ती किंमत वसूल करीत असत.

कोणत्याही परिस्थितीत जर त्यांचा व्यापार पूर्णपणे संपला नसता तर त्यांच्या संपत्तीत इतके मोठे अंतर पडले नसते.

आपल्या टोळीच्या आश्रयाखाली जीवन व्यतीत करणाऱ्या व्यक्तीवर अत्याचार करण्याची जबाबदारी अबू जहलने स्वतःवर घेतली होती. पैगंबर मुहम्मद (स.) स्वतःसुद्धा त्या अत्याचारास बळी पडले होते. बनू हाशिम आणि बनू अब्दे मुनाफ निर्बळ झाले होते; परंतु इतकेसुद्धा नव्हे की आपल्या एखाद्या माणसावर कोणीही जुलूम करावा आणि त्यांनी शांत बसावे. म्हणून पैगंबरांवर अत्याचार करण्यास लोक भीत होते. त्यांना भीती होती की एखादे वेळेस बनू हाशिम टोळीने त्यांच्यावर हल्ला करू नये.

जेव्हा अबू तालिब यांना ही सूचना मिळाली की मुस्लिमांवर सामूहिक रूपाने अत्याचार करण्याची योजना तयार झाली आहे, तेव्हा त्यांनी या समस्येवर विचार-विनिमय करण्यासाठी बनू हाशिमला पाचारण केले आणि त्यांच्यासमोर पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या संरक्षणाचे महत्व विशद केले आणि या गोष्टीशी अबू लहब सोडून संपूर्ण बनू हाशिम टोळीवाले सहमत झाले.

अबू लहब बिन अब्दुल मुत्तलिबचे मूळ नाव अब्दुल उज्जा होते. उज्जा नावाच्या

मूर्तीशी संबंध जोडल्यामुळे त्याला हे नाव मिळाले होते. हा पैगंबर मुहम्मद (स.) यांचा चुलता व अबू तालिबचा सख्खा भाऊ होता. टोळी जीवनाच्या रीतीप्रमाणे त्याची जबाबदारी होती की बनू हाशिम समवेत मिळून पैगंबर मुहम्मद (स.) यांचे संरक्षण करावे. परंतु त्याने अबू सुफियानची बहीण हर्ब बिन उमैयाची कन्या उम्मे जमीला (हम्मालतुल हतब) हिच्याशी विवाह केला होता. पत्नीचा संपूर्ण परिवार विरोधात होता. याबाबतीत अबू लहबने आपल्या सासरच्या नातेवाईकांना साथ दिली.

आणखी एक घटनासुद्धा सांगितली जाते. जेव्हा सईद बिन आस बिन उमैयाचा मृत्यू जवळ आला तेव्हा अबू लहबने त्याची सुश्रुषा केली. त्याने पाहिले की, सईदच्या डोळ्यांतून निरंतर अश्रूधारा वाहत आहेत. अबू लहबने आश्चर्याने प्रश्न केला, ''तुम्ही मृत्यूच्या भीतीने अश्रू गाळीत आहात काय?'' सईदने उत्तर दिले, ''नाही ! मी या विचाराने रडत आहे की माझ्यानंतर 'उज्जा' या मूर्तीची पूजा कोण करील?'' हे ऐकून अबू लहब म्हणाला, ''आपल्या जीवनात लोक उज्जाची पूजा करीत ते आपल्या भयाने नव्हे तर स्वेच्छेने करीत. म्हणून आपल्या मृत्यूनंतर ज्यांना पूजा करावयाची असेल, ते पूजा निश्चितच करतील.'' हे ऐकून सईद फार प्रसन्न झाला. तो म्हणून लागला, ''माझ्यानंतर माझा उत्तराधिकारी आहे हे ऐकून मला आनंद झाला. म्हणून आता मला माझ्या मृत्यूचे अजिबात दुःख नाही.'' अबू लहबने आपले वचन पाळले. तो आजीवन उज्जाची पूजा करीत राहिला.

(किताबुल अस्नाम, अबू मुंजिर हाशिम - अलकलबी)

त्या काळात अबू जहलने पैगंबर मुहम्मद (स.) यांना मनसोक्त शिव्या देण्याची व त्यांची टिंगल उडविण्याची मोहीम सुरू केली, एवढेच नव्हे तर काही शारीरिक कष्टसुद्धा दिले. पैगंबरांनी त्याचे उत्तरही दिले नाही आणि कोणती कार्यवाहीसुद्धा केली नाही. पूर्ण धैर्याने आपल्या अंगिकारलेल्या कार्यात ते निमग्न राहिले. हे वृत्त ऐकून पैगंबर मुहम्मद (स.) यांचे चुलते माननीय हमजा (रजि.) क्रोधावस्थेत काब्यापाशी आले. तेथे अबू जहल व अन्य कुरैशी सरदार बसलेले होते. येताक्षणीच माननीय हमजांनी आपला धनुष्य अबू जहलच्या डोक्यावर मारला व घायाळ केले आणि म्हणाले, ''काय तू मुहम्मद (स.) ला शिव्या देतोस? तर हे पाहा, मीसुद्धा मुहम्मद (स.) यांचा धर्म स्वीकारतो, हिम्मत असेल तर उठून ये.'' अबू जहलच्या बनू मख्जूम कुटुंबातील काही लोक माननीय हमजा (रजि.) यांचा मुकाबला करू इच्छित होते; परंतु स्वतः अबू जहलने मध्यस्थी करून मामला संपविला. प्रकरण वाढविल्याने होणाऱ्या नुकसानीची अबू जहलला कल्पना होती.

माननीय हमजा (रजि.) यांनी इस्लाम स्वीकारल्यानंतर कुरैशच्या सरदारांनी

त्यांच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण प्रश्नावर पुनश्च विचारविमर्श करण्यास प्रारंभ केला. एखाद्या करारावर एकमत करावे या उद्देशाने त्यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांची भेट घेण्याचा निर्णय घेतला. उत्बा बिन रबीआ बिन इब्ने शम्स पैगंबरांना म्हणाला, ''हे माझ्या पुतण्या! तू सामाजिक एकता समाप्त केलीस. त्यांच्या विश्वास व आस्थांना चुकीचे ठरविले, त्यांच्या उपास्यांची निंदा केली, मी तुझ्यासमोर काही गोष्ट ठेवतो. यापैकी तुझी इच्छा असेल ती पसंत कर. तू जर श्रीमंत बनू इच्छित असशील तर आम्ही तुला इतके धन देऊ की आमच्या सर्वांत तू मोठा श्रीमंत होशील. जर तुला पद हवे असेल किंवा तू आमचा बादशाह बनू इच्छित असशील तर यालादेखील आमची तयारी आहे. जर तुला भूतबाधा झाली असेल तर त्याचासुद्धा आम्ही इलाज करू. या संबंधाने येणारा सर्व प्रकारचा खर्च आम्ही स्वत: सहन करु.''

जेव्हा उत्बाने आपले म्हणणे संपविले तेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) म्हणाले, ''आपल्याला जे सांगावयाचे होते ते आपण सांगून टाकले, आता आपण माझे म्हणणे ऐकून घ्या?''

उत्बा म्हणाला, ''अवश्य.''

पैगंबरांनी सूरह ''हा-मीमचे'' पठन सुरु केले आणि जेव्हा पठनामध्ये नतमस्तक होण्याचे स्थळ आले तेव्हा पैगंबर नतमस्तक झाले आणि म्हणाले, ''अबूल वलीद ! लक्षपूर्वक ऐकले? हे आहे माझे उत्तर.''

उत्बा लज्जित होऊन मान खाली घालून निघून गेला. मित्रांजवळ जाऊन म्हणाला, ''मित्रहो! मी आज काही चमत्कारपूर्ण वाणी ऐकली आहे. ती जादूही नाही आणि कविताही नाही. जर तुम्ही माझे म्हणणे ऐकणार असाल तर त्याला त्याच्या स्थितीवर सोडून द्या.''

सर्वांनी एका स्वरात सांगितले, ''ईश्वराची शपथ! मुहम्मद (स.) यांनी तुझ्यावर जादू केली आहे.''

उत्बा म्हणाला, ''मला जे काही सांगावयाचे होते ते मी सांगून टाकले. आता काय करावयाचे ते तुमचे तुम्ही ठरवा.''

यानंतर कुरैश लोकांनी एक मोठी सभा भरविली आणि त्यात पैगंबर (स.) यांना निमंत्रित केले. उपरोक्त गोष्टी त्यांच्यासमोर ठेवल्या. उत्तरादाखल पैगंबर मुहम्मद (स.) म्हणाले, ''मला कोणतेही पद नको. मला सुवार्ता देणारा व भय दाखविणारा म्हणून पाठविले गेले आहे. माझे म्हणणे ऐकाल तर या जगात व परलोकातसुद्धा यशस्वी व्हाल

आणि जर तुम्ही ऐकले नाही तर अल्लाह आमच्या-तुमच्या दरम्यान निर्णय करणारा आहे.''

यानंतर लोक पैगंबर मुहम्मद (स.) यांना अनेक प्रकारे प्रश्न करू लागले. लोक विचारीत असत ''आपल्या पालनकर्त्याला सांगा की त्याने मक्का शहरात एक कालवा प्रवाहित करावा.'' ''सभोवतालच्या दऱ्या खोऱ्यांना परिवर्तित करून त्यांना एक सपाट मैदान बनवावे.'' ''आमच्या मृत पूर्वजांना जिवंत करण्यासाठी ईश्वराजवळ प्रार्थना करा.''

जेव्हा काहीही जमले नाही तेव्हा कुरैशांपैकी एका व्यक्तीने सांगितले, ''आम्ही आमची जबाबदारी पूर्ण केली. आता आम्ही तुला सोडणार नाही. एक तर आम्ही तुला समाप्त करू अथवा तू आम्हाला समाप्त करशील. दोन्हीपैकी एक गोष्ट जोपर्यंत होत नाही तोपर्यंत आम्ही शांत बसणार नाही.''

यानंतर कुरैश, पैगंबर मुहम्मद (स.) यांनासुद्धा कठोर यातना देऊ लागले. एकदा त्यांनी पैगंबरांना काबाजवळ पकडले आणि त्यांच्या मानेला लुंगी बांधून त्यांना ओढू लागले. माननीय अबू बकर (रजि.) वेळेवर तेथे पोहचले नसते तर त्या अत्याचाऱ्यांनी त्यांना जिवंत सोडले नसते.

अशाच प्रकारे कुरैशांनी एका प्रसंगी माननीय अबू बकर सिद्दीक (रजि.) यांना मारहाण केली आणि त्यांच्या दाढीचे केस उपटून काढले.

यानंतर पैगंबर जेव्हा बाहेर निघत तेव्हा लोक त्यांना कष्ट देत व शिवीगाळ करीत, त्यांच्या मार्गात काटे पसरवित आणि घरासमोर घाण व केर-कचऱ्याचे ढीग रचीत.

तात्पर्य; मुस्लिमांना मक्केत राहणे पूर्णत: असंभव झाले. शत्रूंच्या अत्याचारापासून वाचून राहणे त्यांना अशक्य झाले. जेव्हा जेव्हा मुस्लिम येऊन पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकडे तक्रार करीत तेव्हा तेव्हा पैगंबरांना धैर्य राखण्याची शिकवण देत.

परंतु हा अत्याचार सहन करणे अधिक काळापर्यंत शक्य नव्हते. अखेरीस पैगंबरांनी मुस्लिमांना देशाटन करून हब्शा (ॲबिसिनिया) कडे जाण्याची परवानगी दिली. या देशाटनाची अनेक कारणे सांगितली जातात. तथापि मूळ कारण कुरैश लोकांचे अत्यधिक अत्याचारच होते. परंतु एक आश्चर्यजनक गोष्ट अशीही आहे की ते निर्धन व निर्बळ मुस्लिम परदेशगमन करीत नाहीत, ज्यांना खुद्द त्यांच्या टोळीवाल्यांनी शरण देण्यास नकार दिला होता. मग जाणारे कोण होते? ते होते विभिन्न परिवारातील सक्षम व प्रतिष्ठित लोक त्यांच्या निश्चित संख्येविषयी इतिहासावरून अंदाज लावता येत नाही ज्यावरून हे जाणणे शक्य

व्हावे की ते अत्याचारपीडित होते की एखाद्या अन्य कारणामुळे ते तिकडे गेले.[१]

पाश्चिमात्य लेखकांनी अनेक कारणे दिली आहेत. ती केवळ छिद्रान्वेषण वाटतात. त्यांच्यापैकी केवळ एकच कारण असे आहे जे परिस्थितीनुकूल आहे.

इस्लामशी विमुख करून पूर्वजांच्या धर्माकडे मुस्लिमांना परत आणण्याचा कुरैश निरंतर प्रयत्न करीत होते. अबू तालिब व पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याशी कोणताही समझोता न झाल्यामुळे कुरैशच्या प्रत्येक कुटुंबातील लोकांनी आपल्याकडील मुस्लिम लोकांना दमन नीतीचा अवलंब करून इस्लाममधून परत पूर्वजांच्या धर्मात आणण्याचा प्रयत्न सुरू केला. (तबूरी, भाग ३, पृष्ठ ११८०-११८१) उर्वा बिन जुबैरने खलिफा अब्दुल मलिक बिन मरवानच्या नावे एका पत्रात याचा उल्लेख केला आहे. (बुखारी, किताबुल ईमान) त्यांनी लिहिले आहे, ''कुरैशच्या सरदारांनी या प्रश्नावर विचार केला की आपल्या कुटुंबातील लोकांना इस्लामचा स्वीकार करणे व पैगंबरांचे आज्ञापालन करण्यास कसा मज्जाव करावा. अबू जहलचा उपहास करण्याचा उद्देशसुद्धा हाच होता. अबू जहलने मुस्लिमांना लज्जित करण्यासाठी मुस्लिमांना निरंतर असेच म्हणण्यास सुरू केले होते की

---

१. जरी ते सर्वजण सधन व प्रतिष्ठित लोक होते तरी त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारांचा इन्कार करणे योग्य ठरणार नाही. त्यांच्या टोळीवाल्यांकडूनच त्यांच्यावर अत्याचार होत असे आणि यातना दिल्या जात होता. यामुळेच पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या परवानगीने देशत्याग करून ते हब्शाला (ॲबिसिनिया) गेले.

माननीय उस्मान (रजि.) त्या काळातील मुस्लिमांत सर्वाधिक श्रीमंत होते, परंतु असे असूनदेखील त्यांचे चुलते अम्र बिन आस याने त्यांना दोरीने बांधून मारहाण केली. (लेखकाने स्वत: याचा उल्लेख केला आहे.) कुटुंबातील कोणतीही व्यक्ती त्यांच्या मदतीसाठी पुढे आली नाही.

दुसरी एक प्रमुख व्यक्ती जुबैर बिन अब्बास (रजि.) होते, ज्यांना त्यांचे चुलते नौफुल बिन खुवैलदने मारहाण केली. त्या दुष्टाने त्यांना चटईत गुंडाळून बांधून टाकले आणि त्यांच्या नाकात धूर सोडला. ज्यामुळे त्यांना श्वासोच्छवास करणे कठीण झाले.

मुसैयब बिन उमैर (रजि.) यांच्या वडिलांनी त्यांना साखळीने बांधून टाकले होते. बराच वेळ ते हा त्रास सहन करीत राहिले. खालिद बिन सईद (रजि.) यांना त्यांच्या घरच्या मंडळीनी घरात कोंडून जेवण-खाण देणे बंद केले होते. शेजाऱ्यांना ताकीद दिली गेली की त्यांना मदत केली जाऊ नये, त्यांच्याशी कोणीही बोलू नये. शेवटी एके दिवशी संधी साधून त्यांनी पलायन केले. काही दिवस मक्का शहराच्या परिसरातच लपून राहिले आणि देशाटन करणाऱ्या दुसऱ्या समूहासमवेत ते सुद्धा हब्शाला रवाना झाले. सलमा बिन हिशामला त्याचा भाऊ अबू जहलने त्रास दिला आणि अपमानित केले. अत्याचारांच्या या सातत्याने या लोकांना हब्शाला स्वदेश त्याग करून जाणे भाग पाडले.

- भाषांतरकार

तुमचे पूर्वज तुमच्यापेक्षा अधिक चांगले व बुद्धिमान होते. असे असूनदेखील तुम्ही त्यांच्या मार्गाचा त्याग करून नवीन मार्ग बनविला.'' निरंतर पडणाऱ्या पाण्याचा थेंब दगडावरसुद्धा आपले चिन्ह बनवितो. मानसशास्त्रीय पद्धतीने या उपहासाचा उद्देश असा होता की कमीतकमी निर्बळ व्यक्तीवरतरी या निरंतरकेल्या जाणाऱ्या उपहासाचा प्रभाव पडेल. इस्लाम त्यांच्यासाठी एक नवीन गोष्ट होती. त्याच्या प्रभावाने अद्याप भक्कम मूळ धरले नव्हते. त्याचे वातावरण त्यांच्या विश्वास व विचारापासून अगदीच भिन्न व प्रतिकूल होते. राष्ट्रीय किस्से व कथांचा प्रभाव प्रत्येक दिवशी त्यांच्या अनुभवाला येत होता. लोक कठोर परीक्षेत अडकले होते. म्हणून पैगंबरांना वाटले की या विषारी वातावरणापासून त्यांचे लांब निघून जाणे, त्यांच्या हिताचे होईल व अशा प्रकारे त्यांनी त्यांना हब्शा (ॲबिसिनिया) कडे प्रयाण करण्याची परवानगी दिली.

परंतु मुस्लिमांना जो आश्रय मिळाला तो कुरैशांना अजिबात आवडला नाही. त्यांनी हब्शामध्येसुद्धा मुस्लिमांची पाठ सोडली नाही. याचे कारणसुद्धा स्पष्ट होत नाही. मक्काच्या तत्कालीन कायद्यानुसार हे शरणार्थी कोणत्याही प्रकारे अपराधी समजले जाण्यास पात्र नव्हते. कोणताही शिक्षापात्र गुन्हा त्यांनी केला नव्हता, म्हणून त्यांना लपूनछपून करण्याची गरज नव्हती. असे असूनदेखील कुरैश त्यांचा पाठपुरावा सोडीत नव्हते.

कुरैश लोकांनी दोन व्यक्तींची निवड करून त्यांना हब्शाचा बादशाह नजाशीकडे पाठविले. या दोन व्यक्ती बरेचसे धन व नजराणे घेऊन गेले. हब्शाचा बादशाही परिवार व जनता ख्रिश्चन होती. कुरैशी शिष्टमंडळाने दरबारात हजर होण्यापूर्वीच ख्रिश्चन पादरींशी संगनमत करण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक पादरींसमोर भेटवस्तु हजर करताना ते म्हणत असत ''जेव्हा आम्ही बादशाहशी मुस्लिमांसंबंधी बोलू तेव्हा आपण बादशाहला सुचवावे की बादशाहनी मुस्लिमांना परत पाठवावे.'' पादऱ्यांनी हमी दिली.

मग ते राजमहालात उपहार घेऊन गेले. मुस्लिमांना परत पाठविण्याविषयी सांगितले; परंतु त्यांचा डाव फसला. पीडितांना परत पाठविण्यास नजाशी तयार झाला नाही, तर त्याने भेटवस्तूदेखील परत केल्या. अशा तऱ्हेने कुरैशी शिष्टमंडळाच्या अपयशाने घाबरलेले कुरैश, या दरम्यानच माननीय उमर (रजि.) यांनी इस्लामचा स्वीकार केल्यामुळे फारच गोंधळून गेले आणि परिणामस्वरुप त्यांनी आपल्या अत्याचारांचा वेग अधिकच वाढविला.

अशा प्रकारचे निरंतर अपयश कुरैश लोकांचे डोळे उघडण्यासाठी पुरेसे होते. जर त्यांच्यात थोडादेखील समंजसपणा असता तर त्यानी समजून घेतले असते की यापेक्षासुद्धा एखादी बलवान अदृश्य शक्ती कार्यरत आहे; परंतु त्यांनी डोळ्यांवर झापड घालून ठेवली.

एवढेच नव्हे तर निरंतर अपयशाने धगधगत्या आगीत तेलाचे काम केले. त्यांच्या शत्रुत्वाच्या अग्नीने अधिकच पेट घेतला. या उपद्रवाच्या मुळालाच उखडून टाकण्याचा त्यांनी निर्णय घेतला.

कोणत्याही प्रकारे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या हत्येची कुरैश लोकांच्या मनात प्रबळ इच्छा घोळू लागली; परंतु या मार्गातील सर्वांत मोठा धोंडा पैगंबरांचा परिवार होता. प्रत्येक विरोधाच्या वेळी त्यांचा अडथळा समोर येत असे. सरतेशेवटी त्यांनी निर्णय घेतला की, बनू हाशिम व बनू मुत्तलिब यांच्याशी संबंध तोडून टाकावेत; परंतु त्यातसुद्धा त्यांना अपयश आले. अशा प्रकारे त्यांना आशा होती की बनू हाशिम, पैगंबरांना आपल्यापासून वेगळे करतील किंवा त्यांना कुठेतरी दूर रवाना करतील. तमाम कुरैश सरदारांनी मिळून एक प्रतिज्ञापत्र लिहिले. त्याच्या अटी खालीलप्रमाणे होत्या,

(१) बनू हाशिम व बनू मुत्तलिब यांच्याशी वैवाहिक संबंध जोडू नयेत. त्यांच्या मुलींशी विवाह करू नये आणि त्यांना मुली देऊही नये.

(२) त्यांच्याशी देवाण-घेवाणच्या व्यवहाराची परवानगी नाही. त्यांना कोणतीही वस्तू विकू नये व त्यांच्याकडून विकत घेऊही नये.

या दस्तऐवजावर सर्वांनी सह्या केल्या आणि मोहर लावली. त्याची घोषणा करण्यासाठी त्या दस्तऐवजाला काबाच्या दारावर अडकविले. उद्देश असा होता की पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या परिवाराशी देवाण-घेवाणीचा व्यवहार केला जाऊ नये व विवाह केला जाऊ नये, हे सर्वांना कळावे.

बनू हाशिमच्या मंडळींनी आपसात सल्लामसलत केली. आपल्या परिवाराच्या दरीत (शेबे अबी तालिब) गोळा व्हावे एकत्र राहिल्यास व गरज भासल्यास एकमेकाच्या उपयोगी पडता येईल आणि जर विस्कळीत राहिलो तर कुरैशच्या दमन-चक्रापासून स्वत:ला वाचविणे शक्य होणार नाही. अबू लहबला सोडून संपूर्ण परिवार तेथे एकत्र झाला. दोन-तीन वर्षे त्यांनी अपरिमित त्रास व अडचणींना तोंड दिले. कित्येक वेळा झाडांची पाने व साली खाऊन-खाऊन पोटाची आग शमविली. अखेरीस अल्लाहने विरोधकांतूनच सहानुभूती बाळगणारे लोक निर्माण केले. त्यांनी या अत्याचार करणाऱ्यांविरुद्ध आवाज बुलंद केला.

काही दिवसानंतर अबू तालिब व उम्मुल मोमिनीन माननीय खदीजा (रजि.) स्वर्गवासी झाले. ते दोघे अडचणीच्या वेळी पैगंबर मुहम्मद (स.) यांना साथ देत असत. अबू तालिबनंतर परिवाराची सरदारकी त्यांचा धाकटा भाऊ अबू लहबकडे आली. अबू लहबचे शत्रुत्व उघड होते व अशा तऱ्हेने कुरैश लोकांचे अत्याचारसुद्धा पूर्वीपेक्षा अधिक वाढले. पैगंबर जेव्हा जेव्हा बाहेर निघत, लोक त्यांची टिंगल उडवीत व कोट्या

करीत.

एकदा तर एका गुंडाने पैगंबरांच्या डोक्यावर माती टाकली. जेव्हा पैगंबरांना वाटले की मक्काचे कुरैश आपल्या द्वेष व शत्रुत्वाच्या प्रदर्शनात कोणतीही उणीव ठेवणार नाहीत, तेव्हा या आशेवर की कदाचित ताइफची एखादी व्यक्ती आपले म्हणणे ऐकील, ते ताइफला गेले.

ताइफ बनू सकीफची मिळकत होती. येथील लोक धनाढ्य व प्रतिष्ठित होते. मुख्यत्वेकरून अम्र बिन उमैरची तीन मुले (अब्द, मसऊद, हबीब) फारच प्रभावशाली होते. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांना इस्लामचा संदेश दिला; परंतु त्यांनीसुद्धा त्यांचे आवाहन रद्द केले. जेव्हा पैगंबर तेथून निराश होऊन परतले, तेव्हा त्यांनी गुंडांना व गुलामांना पैगंबरांच्या विरुद्ध भडकवून पाठवून दिले. प्रथम तर त्यांनी टाळ्या वाजवून, शिवीगाळ करून पैगंबरांना अपमानित केले आणि नंतर त्यांच्यावर दगडांचा वर्षाव केला, ज्यामुळे त्यांच्या पायाला जखम झाली व रक्त वाहू लागले. पैगंबरांनी मोठ्या मुष्किलीने या लोकांपासून आपली सुटका करून घेतली आणि मक्का येथील एका व्यक्तीच्या बागेत शरण घेतली.

मक्का आणि ताइफ अपेक्षत: मोठी शहरे होती. संपूर्ण देशाचा व्यापार या दोन शहरांतील लोकांच्या हातात होता. वलीद बिन मुगीरा यांचे एक कथन पवित्र कुरआनने अशा प्रकारे उद्धृत केले आहे, ''हा कुरआन दोन्ही शहरांतील एखाद्या मोठ्या माणसावर का उतरला नाही?'' या आयतीच्या शब्द 'दोन शहर'पासून तात्पर्य मक्का व ताइफ आहे. या दोन शहरांतील लोकांनी कसेही करून इस्लामचा स्वीकार करून इहलोक व परलोकातील कल्याण प्राप्त करावे, यासाठी पैगंबर मुहम्मद (स.) यानी दहा-बारा वर्षे निरंतर प्रयत्न केले. परंतु त्यांच्यापैकी अल्पसंख्य लोकांव्यतिरिक्त अन्य सर्व लोकांनी पारिवारिक पक्षपात, शक्ती, मान-सन्मान वगैरेवर गर्व करीत पैगंबरांच्या आवाहनाला रद्द केले. पैगंबर आणि त्यांच्या साथीदारांना त्यांनी प्रत्येक प्रकारच्या अत्याचाराचे लक्ष्य बनविले आणि पैगंबरांचे आवाहन स्वीकारणाऱ्या लोकांना स्वदेश सोडून जाण्यास भाग पाडले.

त्यानंतर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपल्या आवाहनासाठी दुसऱ्या टोळ्यांची भेट घेतली. वर्षभरात हज व अन्य कार्यक्रमासाठी मक्केला येणाऱ्या टोळ्यांच्या मुक्कामाच्या ठिकाणी जाऊन इस्लामचा संदेश पोहचविण्याची पैगंबरांची सवयच झाली होती. परंतु पैगंबर जेथे जेथे जात, तेथे तेथे चुलता अबू लहब त्यांचा पाठलाग करीत असे. जेव्हा पैगंबर आपला संदेश देत तेव्हा तो सांगत असे, ''हा तुम्हाला लात व उज्जाच्या उपासनेपासून दूर

करू इच्छितो. हा एक नवीन धर्म घेऊन आला आहे. तुम्हाला चुकीच्या मार्गाकडे बोलावित आहे. म्हणून त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवू नका, लक्षात ठेवा.''

(इब्ने हिशाम, भाग ५, पृष्ठ ६५)

पूर्ण वर्षभर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी विभिन्न टोळ्यांना इस्लाम स्वीकारण्यासाठी तयार करण्याचा आटोकाट प्रयत्न सुरू ठेवला आणि त्यात प्रगतीसुद्धा झाली. परंतु याबाबतीत फारच थोड्या लोकांनी रूचि दर्शविली.

कारण स्पष्ट होते. मक्का शहराला अरबस्तानच्या पाठीच्या कण्याचे स्थान होते. संपत्ती व सामूहिक शक्तीच्या दृष्टिने मक्कावासी संपूर्ण अरबस्तानात अग्रणी होते. दुसऱ्या क्षेत्रातील लोक त्यांच्यावर आपल्या उपजीविकेसाठी काही अंशी अवलंबून होते. याशिवाय काबासुद्धा मक्केत होता जेथे प्रत्येक टोळीवाले हजसाठी आपली हजेरी लावतात. हजबरोबर व्यापाराचीसुद्धा संधी प्राप्त होते. त्यांचे जीवन बरेचसे यावरच अवलंबून होते. अशा परिस्थितीत जेव्हा मक्कावासी सरदारांनी पैगंबरांचे आवाहन नाकारले, तेव्हा दुसरे लोक कसे स्वीकारणे शक्य आहे?

कोणत्याही परिस्थितीत इस्लामचा सन्मार्ग स्वीकारण्यास राजी नसल्याचे जेव्हा बहुसंख्य मक्कावासीयांनी सिद्ध केले. तेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) यांना ईशआदेश प्राप्त झाला की जे लोक याचा स्वीकार करण्यास तयार आहेत, त्यांनाच त्यांनी आपला संदेश पोहचवावा.

दहाव्या वर्षांच्या हजप्रसंगी पैगंबर आपल्या सवयीनुसार विभिन्न टोळ्यांच्या शिबिरात जाऊन आपला संदेश प्रस्तुत करीत होते. तेथे मदीन्याची टोळी खजरजच्या काही व्यक्तींशी त्यांची भेट झाली. पैगंबरांनी त्यांना इस्लामचा संदेश पोहचविला. त्यांनी स्वीकार केला, दुसऱ्या वर्षी आणखी बारा व्यक्तींनी इस्लामचा स्वीकार केला. तिसऱ्या वर्षी ७३ व्यक्तींनी इस्लामचा स्वीकार केला. अशा प्रकारे हळू हळू मदीन्यात मुस्लिमांनी संख्या चांगलीच झाली. मग पैगंबरांनी मक्केतील मुस्लिमांना मदीना शहराकडे हिजरत-देशत्याग करण्याची परवानगी दिली. अशा प्रकारे ते एक-एक, दोन-दोन करून मदीन्याला पोहचले. अत्यंत निर्बळ व दुसऱ्यांच्या अधीनस्थ असलेले व्यक्तीच मक्केत उरले. याशिवाय पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याबरोबर केवळ माननीय अबू बकर सिद्दीक (रजि.) आणि माननीय अली (रजि.) हेच मागे उरले होते.

शत्रूंचे डोळे उघडले. जर मुस्लिम अशा प्रकारे सर्वच्या सर्व मदीन्याला पोहचले तर पैगंबरसुद्धा एके दिवशी तिकडे निघून जातील, याचा त्यांना अंदाज होता. या घटनेमुळे भविष्यकालीन परिस्थितीचा अनुमान लावण्यास त्यांना विलंब लागला नाही.

त्यांना कळले की पैगंबरांच्या मदीन्याला पोहचण्याचा अर्थ मक्का व मदीना दरम्यान युद्ध सुरु होणार.

या समस्येच्या उपायासाठी ते 'दारुन्नदवामध्ये' एकत्र आले. एका व्यक्तीने सल्ला दिला की पैगंबर मुहम्मद (स.) यांचे हात-पाय बांधून त्यांना एका खोलीत डांबून ठेवावे आणि खाद्य व पेय दिले जाऊ नये.

वरील विचाराचे खंडन करीत अन्य लोक उद्‌गारले, ''जोपर्यंत मुहम्मद जीवित राहील तोपर्यंत आम्हाला शांती मिळणे शक्य नाही. त्याला मुक्त करण्यासाठी त्यांचे अनुयायी आमच्याबरोबर युद्ध करतील. त्याला स्वतंत्र केल्याशिवाय ते शांत बसणार नाहीत.''

दुसऱ्या व्यक्तीने विचार मांडला की, ''त्याला देशाबाहेर हाकलून द्या. त्याने हवे तेथे जावे. त्याच्याशी आम्हाला काय देणे-घेणे आहे? आम्हाला मुक्ती तर मिळेल.'' यावर दुसऱ्याने अशा प्रकारे खंडन केले, ''हा फार मोठा मूर्खपणा ठरेल. मुहम्मदच्या वाणीतील जादू सर्वज्ञात आहे. ज्या कुणापर्यंत ती पोहचेल तो आकर्षित होईल. ईश्वराची शपथ ! जर आम्ही त्याला देशातून बाहेर काढले तर तो आमच्याविरूद्ध संपूर्ण देशात नवीन वातावरण निर्माण करील. आपल्या जादूमय वाणीने तो सर्वांना वशीभूत करून आमच्यावर आक्रमण करील आणि त्याची गुलामी स्वीकारण्यास आम्हाला तो भाग पाडील. मग तो आमच्याशी हवा तसा व्यवहार करील.''

अबू जहलने म्हटले की, ''माझ्या मतानुसार आणखी एक पद्धत अवलंबिली जाऊ शकते. यावर सर्वांनी त्याचा विचार ऐकण्याची इच्छा व्यक्त केली.'' तो म्हणाला, ''आम्ही प्रत्येक टोळीतून एक एक धाडशी तरुण घेऊ आणि त्याच्या हातात तलवार देऊ आणि हे सर्वजण मिळून मुहम्मद (स.) चा निकाल लावतील. अशा प्रकारे आम्हाला मुहम्मदपासून मुक्ती मिळेल आणि त्याला ठार करण्याची जबाबदारीही प्रत्येक टोळीवर राहील आणि प्रत्येक टोळीशी संघर्ष करण्याचे धैर्य बनू अब्द मुनाफमध्ये नाही. मग जर ते एखाद्या मोबदल्यासाठी तयार झाले तर आम्ही त्यांच्याशी बोलणी करू.''

हा ठराव सर्वसंमतीने स्वीकारण्यात आला आणि सर्वजण परतले.

(इब्ने हिशाम, भाग २, पृष्ठ १२५-१२६)

दुसरीकडे दयामूर्ति पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या हिजरत (देशाटन) ची तयारी पूर्ण झाली होती. पैगंबर शत्रूच्या डोळ्यांत धूळ झोकून त्याच रात्री माननीय अबू बकर सिद्दीक (रजि.) यांच्या समवेत मक्का शहर सोडून रवाना झाले. लोकांना दुसऱ्या दिवशी सकाळी ही वार्ता कळाली की त्यांची इच्छित व्यक्ती त्यांच्या हातावर तुरी देऊन निघून गेली आहे, तेव्हा त्यांनी चोहीकडे शोधाशोध सुरु केली; परंतु 'ज्याला देव तारी त्याला कोण

मारी?' त्यांच्या डोळ्यावर झापड पडली. योग्य मार्गाने जाऊनसुद्धा ते पैगंबरांना पकडू शकले नाहीत. शेवटी त्यांनी पैगंबरांना पकडणाऱ्याला शंभर उंटांचे बक्षीस जाहीर केले; परंतु तेही व्यर्थ सिद्ध झाले. अल्लाहने पैगंबरांचे संरक्षण केले. ते शत्रूचा डोळा बचावून त्यांच्यासाठी मृत्यूलासुद्धा आलिंगन देणाऱ्या आपल्या साथीदारापर्यंत जाऊन पोहचले.

आता अनेकश्वरवादी शांत राहतील. कारण त्यांनी बहुतेक मुस्लिमांना देशातून हद्दपार केले होते आणि जे कोणी उरले होते, ते निर्बळ होते असे वाटणे साहजिकच होते. परंतु कुरैश शांत बसू शकले नाहीत. मदीन्यात मुस्लिमांना त्रास पोहचविण्याचा त्यांनी खूप प्रयत्न केला. प्रथम त्यांनी खजरज टोळीच्या अब्दुल्लाह बिन उबई या सरदाराला पत्र लिहिले. त्यात त्यांनी खालील गोष्टींचा उल्लेख केला होता, "आमच्या देशातून पलायन करून जाणाऱ्या लोकांना तुम्ही आश्रय दिले आहे. एकतर त्या सर्वांना ठार करा किंवा त्या सर्वांची मदीन्यातून हकालपट्टी करा. जर असे घडले नाही तर ईश्वर शपथ, आम्ही मदीन्यावर हल्ला चढवून त्याला नष्ट करू. पुरुषांना ठार करू व स्त्रियांना दासी बनवू."

(हदीस : अबू दाऊद)

यानंतर त्यांनी मुस्लिमांना एकाच दमात ठार करण्यासाठी निरंतर तीन युद्धे केली. पहिले युद्ध बद्रमध्ये झाले. हे स्थान मक्का शहरापासून दोनशेहून अधिक व मदीनापासून साठ मैलाच्या अंतरावर आहे. बद्रच्या युद्धानंतर दोन वर्षांनी उहदमध्ये युद्ध झाले. हे स्थान मदीना शहराच्या दक्षिणेस दोन-अडीच कोसांच्या अंतरावर होते. तिसरे युद्ध मदीना शहराच्या तटालगत झाले. मुस्लिम शहरात घेरले गेले. त्यांनी आपल्या रक्षणासाठी शहराच्या दक्षिण भागात खंदक खोदले. प्रत्येक युद्धात अनेकेश्वरवादी पहिल्यापेक्षा संख्येने अधिकच वाढत होते.

येथे युद्धस्थळांचे अंतर व भौगोलिक वर्णन मुख्यत्वेकरून अशासाठी दिले गेले आहे की, पाश्चिमात्य लेखक इस्लामचा प्रसार तलवारीच्या बळावर झाला असा दावा करतात. जर हे सत्य असते तर हे युद्ध मदीन्याजवळ होण्याऐवजी मक्का शहराजवळ झाले असते. या तिन्ही युद्धांत अनेकेश्वरवाद्यांनी हल्ला चढविला व मुस्लिम आपल्या बचावासाठी युद्ध करीत राहिले. परंतु प्रत्येक वेळी मक्कावासी पराजित होऊन परतले. मुस्लिमांची संख्या प्रत्येक दिवशी वाढत चालली आणि अनेकेश्वरवाद्यांच्या शक्तीचा प्रत्येक दिवशी ऱ्हास होत गेला. अखेरीस हिजरत केल्यानंतर आठ वर्षांनी पैगंबर मुहम्मद

(स.) यांनी दहा हजार सोबत्यांच्या समवेत मक्का शहर जिंकले.[१]

ही कृती अत्यंत शीघ्र गतीने, अत्यंत रहस्यपूर्ण रीतीने अमलात आणली गेली. इस्लामी सैन्य मक्का शहराजवळ पोहचेपर्यंत या संबंधीची कोणतीही सूचना अनेकेश्वरवाद्यांना मिळू शकली नाही. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याशी सामना करण्यासाठी ते अजिबात सावध नव्हते. म्हणून मुकाबला न करता हत्यार टाकण्याशिवाय अनेकेश्वरवाद्याजवळ अन्य कोणताही पर्याय नव्हता.

विजयाचा दिवस भूतकाळात घडलेल्या गोष्टींचा सूड उगविण्याचा दिवस होऊ शकला असता. मी या घटनांचे सविस्तर वर्णन अशासाठी केले आहे, की वाचकांचे लक्ष या सत्याकडे वेधले जावे. ते असे की जेव्हा शक्ती कुरैश लोकांच्या हाती होती तेव्हा त्यांनी पूर्णपणे मुस्लिमांवर अत्याचार केले. सर्व प्रकार त्यांना सताविले गेले, देश सोडून जाणाऱ्यांचा पाठलागसुद्धा केला गेला, आपल्या संपूर्ण सेनेसह मदीन्यावर अनेक आक्रमण केली, मुस्लिमांनी एका अल्लाहवरश्रद्धा आणली आणि मूर्तीपूजा सोडून दिली म्हणून त्यांच्या मनात जे शत्रुत्व आले, त्यामुळे ही सर्व कृत्ये त्यांनी केली. परंतु पैगंबर सूड उगविण्यासाठी नव्हे तर अल्लाहच्या दयेचा आदर्श प्रस्तुत करण्यासाठी होते. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी जेव्हा मक्केत प्रवेश केला तेव्हा त्यांनी मक्कावासियांपुढे घोषणा केली, जे प्रतिकार न करता हत्यार खाली ठेवतील अथवा अबू सुफियानच्या घरी किंवा काब्यात आश्रय घेतील किंवा घराचे दरवाजे बंद करून बसून राहतील, त्यांना कसलाही त्रास दिला जाणार नाही.''

(इब्ने हिशाम, भाग ४, पृष्ठ ४६)

शेवटी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी कुरैशांना विचारले, ''तुम्हाला माहीत आहे का

---

१. मक्का जिंकण्यासाठी खालील बाबी कारणीभूत ठरल्या-मक्केतील अनेकेश्वरवाद्यांच्या व पैगंबरांच्या दरम्यान झालेल्या प्रसिद्ध ऐतिहासिक तहामधील अनेक वचनांना मक्कावासीयांनी वेळोवेळी भंग केले आणि याच्या उलट मुस्लिम कोणत्याही प्रकारे वायद्याच्या विरुद्ध काहीही करीत नव्हते. शेवटी अनेकेश्वरवादी भावनेच्या आहारी गेले आणि त्यांनी युद्धविषयक मर्यादांचेसुद्धा उल्लंघन केले.

घटना अशी घडली की, हुदैबियाच्या तहाप्रमाणे बनू खुजाआ पैगंबर मुहम्मद (स.) यांचे मित्र बनले व बनू बक्र कुरैशांचे मित्र बनले. समझोत्याप्रमाणे पैगंबर व कुरैश या दोहोंपैकी कोणाशीही युद्ध करू शकत नव्हते. परंतु एका प्रसंगी कोणत्या तरी भांडणात बनू बक्रने बनू खुजाआवर आक्रमण केले. कुरैशांनीसुद्धा आपले मित्र बनू बक्र यांच्यासमवेत पैगंबर मुहम्मद (स.) यांचे मित्र बनू खुजाआवर हल्ला चढविला. खुजाआने पैगंबरांकडून मदत मागितली. समझोत्याप्रमाणे पैगंबरांवर बनू खुजाआला मदत करण्याची जबाबदारी होती; ज्याचा अर्थ कुरैशांशी युद्ध करणे असा होता. म्हणून पैगंबर मक्का शहर जिंकण्याच्या निश्चयाने निघाले. असे असूनसुद्धा पैगंबरांनी मार्गात व मक्का शहराजवळ अशा पद्धती अवलंबिल्या की जेणेकरून रक्तपाताची वेळ येऊ नये आणि त्यामुळेच रक्तपाताविनाच मक्का शहरावर विजय मिळविला गेला.

मी तुमच्याशी कसा व्यवहार करीन?'' एकाने उत्तर दिले, ''चांगुलपणाचा ते अशासाठी की तुम्ही चांगल्या भावाचे सुपुत्र आहात.'' हे ऐकून पैगंबर उत्तरले, ''आज तुमच्यावर कसलाही सूड उगविला जाणार नाही. जा, तुम्ही सर्वजण स्वतंत्र आहात.''

परंतु पैगंबर मुहम्मद (स.) यांनी इतक्यावर पुरे केले नाही. मक्का विजयाबरोबरच हुनैनचे युद्ध झाले, ज्यात प्रसिद्ध टोळी हवाजिनचा पराजय झाला. पराजित सेनेने ताइफमध्ये शरण घेतली. मुस्लिमांनी तेथपर्यंत त्यांचा पाठलाग केला आणि त्यांना घेरले. सकीफ़ टोळीचे केंद्र तायफ होते. बारा वर्षांपूर्वी तेथील लोकांनी पैगंबरांवर दगडांचा वर्षाव करून त्यांना रक्तबंबाळ केले होते. युद्ध लांबणार असा अंदाज लावून पैगंबरांनी मुस्लिमांना परत जाण्याची आज्ञा दिली आणि त्यांना सन्मार्ग मिळावा म्हणून अल्लाहजवळ प्रार्थना केली.

यानंतर युद्धात मिळालेला शत्रूचा माल पैगंबरांनी वाटून टाकला. कालपर्यंत जे कुरैश पैगंबरांचे घोर शत्रु होते, त्यांना मालाचा मोठा वाटा मिळाला. एक एक श्रीमंताला शंभरपेक्षा अधिक उंट पैगंबरांनी दिले. अबू सुफियानला शंभर उंट, त्याचा मुलगा मुआवियाला शंभर उंट, हकम बिन हिशामला शंभर उंट अशा प्रकारे मक्केतील अनेक व्यक्तींना शंभर शंभर उंट दिले गेले. त्यांच्यापेक्षा खालच्या दर्जाच्या लोकांना पन्नास पन्नास उंट मिळाले. यात पैगंबरांचा उद्देश त्यांचे मन राखावयाचे होते. ते एका काळापर्यंत मुस्लिमांचे शत्रु होते आणि शेवटच्या काळात त्यांनी इस्लामचा स्वीकार केला असल्याने प्रारंभ काळातील मुस्लिमांच्या तुलनेने त्याना कमी लेखून कमी वाटा मिळले. त्याचा हा भ्रम पैगंबरांना दूर करावयाचा होता.

उदारता, क्षमा, बंधुभाव, सहानुभूती वगैरेचे इतक्या उच्च कोटीचे उदाहरण मानव इतिहासातील एखाद्या नेत्याने प्रस्तुत केले आहे काय? इस्लाम व मुस्लिमांना त्रास न देणारी एकसुद्धा व्यक्ती मक्केत नव्हती. गरीब मुस्लिमांना मारून मारून घायाळ करून टाकले. मुस्लिम होणाऱ्या गुलामांवर केल्या गेलेल्या अत्याचारांचा केवळ विचार येताच अंगावर शहारे उभे राहतात. अत्याचाराने पीडित होऊन हब्शा (ॲबिसिनिया) ला जाणाऱ्या लोकांचा पाठलाग केला गेला. हर प्रकारे त्यांना मक्केला परत आणण्याचे प्रयत्न केले गेले. बाकीचे लोक जेव्हा मदीन्याला गेले तेव्हा तेथेसुद्धा त्यांच्याशी अनेक युद्धे केली गेली. सर्व लोकांना मुस्लिमांविरुद्ध भडकवून एकत्र केले गेले. अल्लाहने इस्लामला यशस्वी केले. विरोधकांचा प्रयत्न विफल झाला. अल्लाहने आपल्या पैगंबरांच्या हाती आपल्या विरोधकांचे प्राण व संपत्ती दिली. तेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांच्यावर सूड उगविला नाही तर त्यांच्यासमोर त्यांनी केलेल्या दुष्कृत्यांचा उल्लेखसुद्धा केला नाही आणि त्यांना सांगितले की, ''तुमच्या बाबतीत कोणतीही तक्रार नाही, तुम्ही सर्वजण स्वतंत्र आहात.'' त्यांची घरेसुद्धा पैगंबरांनी युद्धात मिळालेल्या मालमत्ता संपत्तीने भरून टाकली.

असा आहे दयामूर्तीचा व्यवहार आपल्या अनेकेश्वरवादी शत्रूबरोबर !

यहुदी (ज्यू)

कोणत्याही परिस्थितीत यहुदी मक्केत समस्या बनू शकत नव्हते तशी संधीही नव्हती. कारण तेथे त्यांची संख्या नाममात्र होती. तेथील बहुसंख्य तर अरबस्तानातील अनेकेश्वरवाद्यांची होती. म्हणून मक्केत केवळ त्यांच्याशीच प्रसंग होता. मदीना शहरात यहुदी मोठ्या संख्येने राहत होते. म्हणून पैगंबर मुहम्मद (स.) मदीन्याला जाताक्षणी यहुदी लोकांशी सामना सहज-स्वाभाविक होता. यहुदी लोकांनी त्यांच्यावर श्रद्धा का आणले नाही? हा पहिला प्रश्न ज्यावर आपण विचार केला पाहिजे.

पवित्र कुरआनच्या सूरह 'हूद' मध्ये, जेथे हूद (अ.) यांना त्यांच्या लोकसमुहात पाठविले जाण्याचा उल्लेख आहे, तेथे त्यांच्या लोकसमुदायाशी झालेल्या संवादाचासुद्धा उल्लेख आहे. त्यांच्या जातीने कोणत्याही प्रकारे आपल्या पैगंबरांवर श्रद्धा बाळगली नाही. तेव्हा त्यांचा विनाश करण्याचा उल्लेख आहे आणि नंतर सांगितले गेले आहे की,

''हे आहेत आद आपल्या पालनकर्त्याच्या वचनांचा यांनी इन्कार केला, त्यांच्या पैगंबरांचे ऐकले नाही आणि सत्याच्या प्रत्येक जबरदस्त शत्रूचे अनुकरण करीत राहिले.''

(दिव्य कुरआन, ११:५९)

ही आयत जेव्हा जेव्हा माझ्या नजरेखालून गेली तेव्हा मला आश्चर्य वाटले की, आद यांनी तर एका पैगंबरांचा इन्कार केला होता; परंतु त्यांच्यावर सर्व पैगंबरांचा इन्कार करण्याचा आरोप कसा लावला गेला? पूर्वी होऊन गेलेल्या तमाम पैगंबरांवर त्यांच्या विरोधकांनी जे अत्याचार केले, त्याचे रहस्य यातच लपलेले आहे. या प्रश्नाचे एक उत्तर माझ्या मनावर अंकित होऊन गेले आहे. माझे स्वत:चे असे मत असावे किंवा एखाद्या ग्रंथात माझ्या वाचनात आले असते.

आपण पाहता की, निसर्गाने विभिन्न वस्तूंचे वर्गीकरण केले आहे. आता दर दैनिक उपयोगाच्या वस्तूसुद्धा अशाच प्रकारे उत्पादित केल्या जातात. आम्ही जो 'ट्रेड मार्क' म्हणतो तेसुद्धा वास्तविकत: याच वर्गीकरणाचे एक उदाहरण आहे. याचा उद्देश असा की, एका वर्गास अथवा जातीला दुसऱ्या वर्ग व जातीपासून गुणांच्या आधारे वेगळे करणे. ईशनिर्मित प्राण्यांपैकी प्रत्येकाची सवय, गुण, जन्म, उद्देश भिन्न भिन्न आहेत. एखाद्या विशिष्ट प्रकारच्या वस्तूला दुसऱ्या प्रकारापासून वेगळे करणे, तज्ञ व्यक्तीला अवघड जात नाही.

परंतु विहंगम दृष्टी बाळगणाऱ्या व्यक्ती त्या वस्तूच्या गुणांची कल्पना नसल्यामुळे त्याला दुसऱ्या प्रकारापासून वेगळे करू शकत नाहीत. एखादी जर तज्ञ व्यक्तीसुद्धा तिला दुसऱ्या वस्तूपासून वेगळी करू शकली नाही. तर याचा अर्थ असा की ती व्यक्तीही

यासंबंधी अज्ञानी आहे. तिने त्या विषयाचा सखोल व गांभीर्यपूर्वक अभ्यास केलेला नाही, असेच म्हणावे लागते.

प्रत्येक काळात पैगंबरांचा विरोध करणाऱ्या लोकांच्या बाबतीतसुद्धा असेच घडले आहे. कोणत्याही पैगंबरांवर जाणीवपूर्वक ईमान आणणारे लोक आपल्याकडे येणाऱ्या दुसऱ्या पैगंबरांचा इन्कार करू शकत नाहीत. जर एखादा मनुष्य एका पैगंबरांवर श्रद्धा बाळगून दुसऱ्या पैगंबरांचा इन्कार करतो, तर याचा अर्थ असा की तो मनुष्य एखाद्या विशेष प्रकाराचा सखोल अभ्यासुक तज्ज्ञ आहे, ज्याला या विशिष्ट वस्तूला ओळखणे कठीण जात आहे. याचा अर्थ असा की, ज्या तऱ्हेने विशेष प्रकारच्या वस्तूचे अध्ययन करणाऱ्याला त्या प्रकाराच्या गुणांचे ज्ञान नसते, तसेच एका पैगंबरांवर श्रद्धा बाळगणाऱ्या व्यक्तीला पैगंबरांच्या गुणांचे ज्ञान नाही. याच कारणास्तव तो मनुष्य पैगंबरांचा इन्कार करू लागतो. म्हणून एका पैगंबरांच्या इन्काराचा अर्थ असा झाला की सर्वच पैगंबरांच्या आगमनाचा त्याने इन्कार केला.

म्हणूनच 'आद' जातीने माननीय हूद (अ.) यांचा इन्कार केला. यास्तव त्याला पवित्र कुरआनने सर्व पैगंबरांचा इन्कार मानले. कारण त्यांना कल्पना होती की पैगंबरांची (पैगंबरत्वाची) वास्तविकता काय आहे? पैगंबरांची वैशिष्ट्ये काय आहेत? सामान्य माणसापेक्षा पैगंबरांमध्ये कोणती गोष्ट वेगळी असते?

पाहा, यहुदी (ज्यू) लोकांत किती पैगंबर आले? पवित्र कुरआन म्हणतो,

''आणि एकापाठोपाठ एक अनेक पैगंबर आले.''

परंतु जेव्हा त्या यहुदी लोकांत माननीय ईसा मसीह (येशू ख्रिस्त) पैगंबर म्हणून आले, तेव्हा त्यांच्यापैकी बहुतेकांनी त्यांना ओळखले नाही. त्यांच्यावर श्रद्धा बाळगण्याचे सौभाग्य त्यांना प्राप्त झाले नाही, कारण माननीय मूसा (अ.) आणि त्यांच्यानंतर लागोपाठ येणाऱ्या पैगंबरांवर श्रद्धा बाळगणे केवळ एका सवयीप्रमाणे झाले, जो पूर्वजांचे अंधानुकरण करण्याचा परिणाम होय. म्हणूनच कालांतराने येणाऱ्या पैगंबरांना ते ओळखू शकले नाहीत. यावरून असे कळते की ज्या ज्या पैगंबरांवर श्रद्धा बाळगण्याचा ते दावा करीत असत तेच पैगंबर जेव्हा स्वत: येत तेव्हासुद्धा हे लोक त्यांना ओळखू शकत नव्हते, एवढेच नव्हे तर ते त्यांना खोटे ठरवीत.

होय, जेव्हा यहुदी लोकांनी एका पैगंबरांचा इन्कार केला तेव्हा वास्तविकत: त्यांनी सर्वच पैगंबरांना खोटे ठरविले.

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या युगातील यहुदी एका पैगंबराच्या आगमनाची अत्यंत व्याकुळतेने वाट पाहत होते. त्यांच्या निशाण्यासुद्धा प्रबळ झाल्या होत्या. यहुदी लोकांच्या धर्मग्रंथ व कथनांच्या वर्णनावरून येणाऱ्या पैगंबराची प्रतीक्षा तीव्रतेने होत होती. परंतु

येणारा आला आणि जेव्हा त्याने आपल्यावर श्रद्धा बाळगण्याविषयी सांगितले तेव्हा त्यांनी इन्कार केला.

माननीय दाऊद (अ.), सुलैमान (अ.), इसहाक (अ.), याकूब (अ.), इस्माईल (अ.), यसआ (अ.), जकरिया (अ.) आणि माननीय याहया (अ.) वगैरेंचा वारंवार उल्लेख करण्यापाठीमागे पवित्र कुरआनचा उद्देश हा आहे की जेव्हा तुम्ही या पैगंबरांना खरे मानता तर त्याच कसोटीवर पैगंबर मुहम्मद (स.) यांना ठेऊन त्यांची पारख करा. कारण पूर्वीच्या पैगंबरांची जी स्थिती होती, अगदी तीच स्थिती पैगंबर मुहम्मद (स.) यांची आहे, हे त्यांना समजावून द्यावे.

मक्केतील अनेकेश्वरवाद्यांची एक विवशता होती. त्यांच्या धारणामध्ये पैगंबरत्वाची कोणतीही विशेष कल्पना नव्हती. पैगंबर कोणास म्हणतात? त्यात कोणते गुण असतात? वगैरेंबद्दल त्यांना अजिबात कल्पना नव्हती. म्हणून पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर श्रद्धा न बाळगण्याबद्दल त्यांची विवशता समजण्याजोगी होती; परंतु यहूदींच्या बाबतीत हे शक्य नव्हते. माननीय मूसा (अ.) यांच्यानंतर त्यांच्यात निरंतर पैगंबर येत राहिले. ज्या जातीत इतके पैगंबर निरंतर आले असतील तिच्यासाठी असे म्हणून आपली बाजू काढून घेणे की, पैगंबरत्वाचे गुण आम्हाला माहीत नाहीत. हे कसे शक्य आहे? असे असूनदेखील ते ज़र पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या पैगंबरत्वाचा इन्कार करीत असतील तर यावरून पूर्वीच्या पैगंबरांवरील त्यांच्या श्रद्धेमध्ये ही सत्यता नव्हती हे स्पष्ट होते. भूतपूर्व पैगंबरांवरील त्यांची श्रद्धा सत्याच्या शोधावर आधारित नव्हे, तर ते पूर्वजांच्या अंधानुकरणाचे फळ होते. खऱ्या पैगंबरांच्या निशाण्या माहीत नसल्यामुळे जेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) त्यांच्यापाशी आले तेव्हा श्रद्धा बाळगण्याचे सौभाग्य त्यांना प्राप्त झाले नाही. परंतु आम्ही पाहू शकतो की त्यांनी सुरवातीलाच पैगंबर मुहम्मद (स.) यांना विरोध केला नाही.

मदीना शहरात यहुदी लोकांच्या तीन टोळ्या राहत होत्या - बनू कैनकाअ, बनू नजीर व बनू कुरैजा. या व्यतिरिक्त त्यांच्या काही शाखासुद्धा अस्तित्वात होत्या. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी मदीन्यात येताच राज्याला बळकट करण्यासाठी एक करार तयार केला, ज्यास मदीना राज्याचे भौतिक संविधान म्हणून नाव दिले जाऊ शकते. त्यामध्ये मुहाजिर, अन्सार व यहुदी टोळ्यांच्या अधिकार व कर्तव्याची नोंद त्यांच्या परवानगी व अनुमतीने सविस्तररित्या केली गेली होती. नंतर कोणत्याही प्रकारची शंका अथवा भ्रम निर्माण होता कामा नये, यासाठी असे केले गेले.

येथील चर्चेशी संबंधित कलमांचे संक्षिप्त विवरण असे,

१. यहुदी (ज्यू) मुस्लिमांबरोबर एका राज्याचे नागरिक म्हणून राहतील. यहुदी व मुस्लिमांना आपापल्या धर्मानुसार जीवन जगण्याचा अधिकार आहे. जर एखाद्याने जुलूम

केला अथवा समझोत्याच्या विरुद्ध कृत्य केले तर त्याची जबाबदारी केवळ त्याच्यावर आणि त्याच्या कुटुंबावर राहील.

२. जोपर्यंत दोघे मिळून युद्ध करतील तोपर्यंत मुस्लिमांप्रमाणेच यहुदीसुद्धा खर्चाचा भार उचलतील.

३. त्यांच्यापैकी कोणीही पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या परवानगीशिवाय युद्धासाठी जाणार नाही.

४. यहुदी व मुस्लिम आपापला खर्च उचलतील.

५. या समझोत्यानुसार जर कोणाच्याही विरुद्ध कोणतेही युद्ध असेल, तर मुस्लिम व यहुदी एक दुसऱ्याला साथ देतील आणि यासंबंधी निर्णय करण्यासाठी एक - दुसऱ्याचा सल्ला घेतील आणि सहानुभूती दाखवतील आणि समझोत्याचे पालन करतील व त्याच्याविरुद्ध वागणार नाहीत.

६. या समझोत्यात सहभागी असलेल्या लोकांचे आपापसात भांडण झाले अथवा एखाद्याची हत्या झाली, की ज्यामुळे दोन्ही पक्षात भांडण अथवा शंका उत्पन्न होण्याची संभावना बळावली असेल तर अल्लाहचे कायदे आणि पैगंबरांच्या निर्णयानुसार प्रश्नाची सोडवणूक केली जाईल.

७. कुरैश अथवा त्यांना मदत करणाऱ्यांना कोणत्याही स्थितीत आश्रय दिला जाणार नाही.

८. मदीना शहरावर आक्रमण झाले तर यहुदी व मुस्लिम एकमेकाला मदत करतील.

समझोत्याच्या उपरोक्त अटीवरून खालील गोष्टी लक्षात येतात -

अ) मुस्लिमांप्रमाणे यहुदींनीसुद्धा पैगंबर मुहम्मद (स.) यांना आपल्या राजनीतिक समस्यांकरिता निर्णायक मानले होते. भांडण-तंट्यात पैगंबरांच्या निर्णयाचे कठोरतेने पालन करण्याचे ठरले होते.

आ) यहुदी आपल्या धार्मिक बाबतीत पूर्णपणे स्वतंत्र होते, परंतु मुस्लिमांच्या शत्रूंना प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे मदत पोहचविण्याचा त्यांना अधिकार नव्हता.

इ) मदीन्यावर आक्रमण झाल्यास देशाच्या संरक्षणासाठी मुस्लिमांबरोबर सल्लामसलत करणे आणि खांद्याला खांदा लावून युद्ध करणे यहूदींचे कर्तव्य होते. यहुदी आपला सैनिकी खर्च स्वत: उचलतील. जोपर्यंत युद्ध सुरु असेल तोपर्यंत युद्धविषयक खर्च त्यांना स्वत: सहन करावा लागेल. (इब्ने हिशाम, भाग २, पृष्ठ १४२-१५०)

हा समझोता यहुदी लोकांच्या पूर्ण सहमती व अनुमतीशिवाय लागू होणे शक्य नव्हते. यावरून ते मुस्लिमांचा विरोध करणार नाहीत, व मुस्लिमांबरोबर एक राष्ट्र सुद्धा बनविण्यासाठी तयार असल्याचे निदर्शनात येते. परंतु लवकरच त्यांच्या या दृष्टिकोनात परिवर्तन आले आणि अनेक प्रकारचे संघर्ष व कट-कारस्थान

रचण्यास त्यांनी प्रारंभ केला.

१. यहुदी लोकांच्या विरोधाचे कारण

यहुदी-शिक्षण, मान-सन्मान, सत्ता, धन व संघटनात्मक दृष्टिने मदीना शहरातील अरब लोकांपेक्षा अधिक प्रगत होते. मदीन्याच्या टोळ्या औस व खजरज यांना आपापसात लढवून 'फूट पाडा व राज्य करा' ची नीति त्यांनी अवलंबिली होती. अडचणीच्या वेळी अरब लोक त्यांच्याकडून कर्ज घेत असत. त्यामुळे सुद्धा त्यांच्या प्रतिष्ठेत वृद्धी होत होती.

याच परिस्थितीत मक्का शहराचे गरीब मुस्लिम मदीना शहराकडे हिजरत (देशाटन) करून गेले होते. यहुदी लोकांनी या गोष्टीस अधिक महत्त्व दिले नाही. त्यांची कल्पना होती की मुस्लिमांच्या हिजरतमुळे त्यांच्या प्रजेची संख्या वाढली आहे, कारण त्यांची अशी कल्पना होती की गरीब मुस्लिम कोणत्याही स्थितीत या यहुदी लोकांवर आक्रमण करू शकणार नाहीत. यानंतर जेव्हा पैगंबर मदीनेला आले तेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या प्रभावाचा सुद्धा आपल्या हितासाठी प्रयोग करण्यासाठी त्यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यासमवेत मिळून मिसळून राहण्यास सुरवात केली; परंतु लवकरच त्यांना कळले की त्यांनी आपल्या शक्तीपेक्षा अधिक भार उचलला आहे, त्यांच्या जाळ्यात सापडण्यास पैगंबर अथवा सर्व मुस्लिम तयार नव्हते. येथून विरोधाचा प्रारंभ झाला.

२. बनू कैनकाअ

शहराच्या मध्य वस्तीत 'मुसल्ली' नावाच्या स्थळाजवळ बनू कैनकाअ राहत असत. त्यांचे दोन लहान किल्ले होते. उपजीविकेच्या दृष्टीने ते जहागीरदारही नव्हते आणि धनवानही नव्हते. ते केवळ श्रमिक होते. सामान्यपणे ते सोनाराचे काम करीत असत. त्यांनी आपले एक मार्केट सुद्धा बनविलेले होते. देशाचा कारभार हळू हळू त्यांच्या हातात येत गेला. तीन यहुदी टोळ्यांत ते तुलनेने अधिक शक्तिमान व प्रतिष्ठित होते. आपल्या शक्ती व संपत्तीचा त्यांना अभिमान होता. कदाचित याच भावनेमुळे त्यांना सर्व प्रथम समझोत्याचा भंग करण्यास उद्युक्त केले गेले.

बद्रच्या युद्धानंतर सन ६३६ मध्ये एकदा पैगंबर मुहम्मद (स.) यांना त्यांच्याशी बोलणी केली. तेव्हा त्यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याशी फार अशिष्टतेचा व्यवहार केला. याबाबतीत पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांना खबरदार केले की, "अल्लाहचे भय बाळगा, बद्रच्या युद्धात कुरैश लोकांवर जे काही ओढवले, तशा प्रकारचा अल्लाहचा प्रकोप येण्याचे भय बाळगा, मी तुमच्याकडून केवळ चांगुलपणाची अपेक्षा करतो. तुम्हाला तर चांगल्याप्रकारे ज्ञात आहे की मी तोच पैगंबर आहे ज्याचा उल्लेख तुमच्या ग्रंथात आला आहे. इस्लामचा स्वीकार करा. माझे आज्ञापालन करण्याचा आदेश अल्लाह तुम्हाला देत आहे."

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या या शिकवणीला त्यांनी अशा कठोर शब्दात प्रतिसाद दिला की, ''तुमच्या बरोबरीचे, तुमचे तुल्यबळ लोक आम्ही आहोत. एका अशा जातीशी, जिला सामरिक नैपुण्य प्राप्त नव्हते, बद्रमध्ये तुम्ही युद्ध केले आणि युद्ध जिंकले म्हणून तुम्ही भ्रमात असाल. परंतु ईश्वराची शपथ ! जेव्हा आमच्याशी सामना होईल तेव्हा आम्ही दाखवून देऊ की मर्द कुणाला म्हणतात ते !'' (इब्ने हिशाम, भाग ३, पृष्ठ ५०)

अशाच प्रकारचा अभिमान व गर्व काही काळ त्यांच्यावर आच्छादित राहिला खालील प्रसंगी उघडरित्या त्याची प्रचिती आली.

एके दिवशी काही वस्तू खरेदी करण्यासाठी एक मुस्लिम स्त्री बनू कैनकाअच्या बाजारात गेली. एका सोन्याच्या दुकानातून वस्तू खरेदी करून परत येत असत एका यहुदी सोनाराच्या दुकानात गेली. त्या यहुदीने त्या महिलेला आपला नकाब (बुरखा) वर करण्यास सांगितले. महिलेने तसे करण्यास नकार दिला. तेव्हा त्या यहुदीने नकळतपणे तिच्या वस्त्राचे एक टोक पाठीमागून बांधले. अशा प्रकारे ती अकस्मात उभी राहिल्यामुळे तिचे गुप्त स्थान उघडे पडले. हे पाहून यहुदी गुंड खदखदा हसू लागले व टिंगल उडवू लागले. ती हा अपमान सहन करू शकली नाही आणि मदतीसाठी तिने मोठमोठ्याने ओरडावयास सुरवात केली. जवळच उभ्या असलेल्या एका मुस्लिमांचे रक्त हे ऐकून खवळले. तो धावत आला आणि त्याच क्षणी त्याने यहुदीला ठार केले. बाजार यहुदी लोकांचा होता. ते चोही बाजूने जमा झाले आणि त्या मुस्लिमांला ठार केले.

या हत्याकांडाची बातमी कळताच मुस्लिम भडकले आणि ते युद्धासाठी एक-दुसऱ्याची मदत मागू लागले. अखेरीस युद्ध सुरु झाले. पैगंबरांनी प्रथम बनू कैनकाअच्या किल्ल्याला वेढा घातला. पंधरा दिवसांपर्यंत लांबलेल्या वेढ्याने यहुदी हतबल झाले आणि ते समझोत्यास तयार झाले. (इब्ने हिशाम, भाग ३, पृष्ठ ५०)

थोडा विचार करा! अशा स्थितीत त्यांना किती कठोर शिक्षा मिळणे आवश्यक होते? त्यांनी मुद्दामच उपद्रव निर्माण केला. समझोत्यानुसार यहुदी व मुस्लिम एक राष्ट्र होते. म्हणून मुस्लिम महिलेला अपमानित करण्यापासून त्या गुंडांना रोखणे आवश्यक होते. आपल्याच माणसाला अशा लांच्छनास्पद कृत्य करण्याबद्दल कठोर शिक्षा करणे आवश्यक होते. खुल्या बाजारात एका शिष्ट महिलेचा उपहास करणे आणि त्यावर मोठ्याने हसणे एक अमानवीय कृत्य होते व त्यात गर्विष्ठपणा होता. भावनेच्या आहारी जाऊन जरी त्या मुस्लिमांने यहुदीची हत्या केली होती तरी समझोत्याप्रमाणे त्यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या सेवेत निर्णयासाठी हजर होणे आवश्यक होते. परंतु त्यांनी असे न करता सर्वांनी मिळून त्या मुस्लिमांची हत्या केली. या सर्व चुका असूनदेखील जेव्हा यहुदी समझोत्यासाठी आले तेव्हा त्या गोष्टीचा पैगंबरांनी स्वीकार केला. खचितच त्यांच्या

संपत्ती व शस्त्रांसाठ्यावर मुस्लिमांनी कब्जा केला असेल, परंतु कोणा एकाचाही जीव घेतला नाही. (तबकाते इब्ने साद १०२-१०९)

खजरज टोळीचा सरदार अब्दुल्लाह बिन उबई बिन सलूल मुस्लिमांपैकी होता. बनू कैनकाअ या टोळीचे मित्र होते. जेव्हा अब्दुल्लाह बिन उबईला बनू कैनकाअनी युद्धात शरणागती पत्करली असण्याची बातमी मिळाली तेव्हा तो पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जवळ आला आणि म्हणाला, ''कैनकाअ आमचे मित्र आहेत. म्हणून त्यांच्याशी सौम्य व्यवहार करण्यात यावा.'' इब्ने हिशामच्या कथनानुसार यासंबंधी अब्दुल्लाह, पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या सेवेत त्या वेळी आला जेव्हा पैगंबर बनू कैनकाअना त्यांच्या अत्याचाराची व समझोता भंग करण्याची शिक्षा देण्याचा इरादा करीत होते. पैगंबरांनी ती मागणी स्वीकारून त्यांना सोडून दिले व कदाचित असे म्हटले की, ''जा, या व्यक्तीसाठी आम्ही तुम्हाला सोडून देत आहोत.'' (इब्ने हिशाम, भाग ३, पृष्ठ ५३)

परंतु सुनन अबू दाऊद (किताबुल खिराज) वरून असे कळते की, इब्ने हिशामचे उपरोक्त कथन बरोबर नाही. कारण जेव्हा आज्ञापालनाची खात्री दिल्यानंतर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांना व त्यांच्या कुटुंबियांच्या जीवित–वित्ताचे अभयदान दिल्यानंतर दुसरी शिक्षा देणे विश्वसनीय वाटले नाही.

त्यानंतर ७०० लोकांची ही टोळी मदीना सोडून पॅलेस्टाईनला गेली. जाताना पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांना सामरिक हत्याराशिवाय सर्व वस्तू घेऊन जाण्याची परवानगी दिली.

३. बनू नजीर

बनू नजीर मदीना शहराच्या बाहेर आग्नेय दिशेला राहत होते. ते जमीनदार व व्यापारी होते. कुरैश लोकांबरोबर त्यांचा कायमस्वरूपी व्यापार चालत असे. 'बेरे मऊना कांड' बनू नजीर कांडाचा शेवटचा अध्याय आहे. म्हणून त्याचा उल्लेख करणे आवश्यक वाटते.

हिजरी सन ४ मध्ये बनू आमिर टोळीतील एक गृहस्थ अबू बरा आमिर बिन मालिक जाफर हे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या सेवेत हजर झाले. त्या वेळी ते मुस्लिम झालेले नव्हते. पैगंबरांनी सवयीनुसार त्यांना इस्लामचा संदेश पोहचविला. त्यांनी त्या संदेशाचा स्वीकारही केला नाही व नकारही केला नाही. परंतु पैगंबरांकडे निवेदन केले की, ''काही लोकांना माझ्याबरोबर इस्लामच्या प्रचार व प्रसारासाठी पाठवा त्यांनी सर्वप्रथम माझ्या टोळीला इस्लामी शिकवणीने परिचित करावे.'' पैगंबर म्हणाले, ''माझा नज्दवासीयांवर

अधिक विश्वास नाही.'' तेव्हा आमिरने शाश्वती दिली की, ''आपण त्यांना पाठवा, त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी माझ्यावर आहे. इस्लामचा संदेश माझ्या जातवाल्यांपर्यंतसुद्धा पोहचला पाहिजे.'' (इब्ने हिशाम, भाग ३, पृष्ठ ५२)

अशा प्रकारे मुन्जिर बिन अम्र (रजि.) यांच्या नेतृत्वात पैगंबरांनी ४० सोबत्यांना रवाना केले. त्यांच्यापैकी अधिकांश 'अहले सुफ्फा' होते, पवित्र कुरआन तोंडपाठ करणारे विद्वान होते. सहाबांची (पैगंबरांचे सोबती) ही मंडळे बेरे मऊना या बनू आमिरच्या प्रदेशात दाखल झाली. हराम बिन मिल्ह यांना पैगंबर मुहम्मद (स.) यांचे पत्र देऊन टोळीचा सरदार आमिर बिन तुफैल याच्याकडे रवाना केले गेले. आमिर इस्लामचा कट्टर शत्रू होता. यापूर्वी त्याने पैगंबरांशी एक समझोता केला होता. वाळवंटी भागाचा मालकी हक्क पैगंबरांना व शहराची मिळकत त्याची आणि त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या वारसाची राहील, या अटीसह समझोता होता. याची हमी दिल्यास तो इस्लामचा स्वीकार करण्यास तयार आहे. जर या समझोत्यासाठी पैगंबर तयार झाले नाहीत तर तो बनू गतफान यांच्याशी हातमिळवणी करून पैगंबरांशी युद्ध करील. या अटीही त्यामध्ये समाविष्ट होत्या.

(हदीस : बुखारी - किताबुल मगाजी)

हराम बिन मिल्ह आमिर बिन तुफैलजवळ पोहचले आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांचे पत्र दिले. आमिरने पत्र वाचण्याचा त्रास न घेताच हराम (रजि.) यांना निष्ठूरपणे ठार केले. त्यानंतर जवळच्या सर्व टोळ्यांना एकत्र करून इस्लामच्या अनुयायांना ठार केले. सौभाग्याने दोन व्यक्ती वाचल्या, ज्यांच्यापैकी एका व्यक्तीचे नाव अम्र हजमी होते. ते दोघे मदीन्याल परत येत होते. मार्गात त्यांनी बनू आमिरच्या दोन व्यक्तींना पाहिले. अम्रच्या सोबत्यांशी बनू आमिरने जो व्यवहार केला होता, त्याचा क्रोधाग्नी त्यांच्या उरात पेटला होता. संधी मिळताच त्या दोघांना त्यांनी ठार केले. त्या दोघांजवळ पैगंबरांची अनुमती व पत्र असण्याची त्याना कल्पना नव्हती. अम्रने पैगंबरांच्या दरबारात हजर होऊन सर्व घटना ऐकविली.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''तुम्ही त्या निरपराध लोकांना ठार केले. आता त्यांच्या कुटुंबियांना 'खून बहा' (हत्येबद्दल मोबदला) द्यावाच लागेल.''

(इब्ने हिशाम, भाग २, पृष्ठ १४-१५)

बनू आमिर व यहुदी टोळी बनू कैनकाअ आपसांत मित्र होते. दुसरीकडे पैगंबर मुहम्मद (स.) आणि बनू नजीरमधील समझोत्यानुसार 'खून बहा' अदा करण्यासाठी दोघेही तितके जबाबदार होते. अशा स्थितीत पैगंबरांनी बनू नजीरशी 'खून बहा' मधील आपला वाटा अदा करण्याचा तगादा केला. समझोता असल्याने आपला वाटा अदा

करण्यास ते नकारसुद्धा करू शकत नव्हते; परंतु त्यांनी टाळाटाळ करावयास सुरवात केली. एकदा पैगंबर काही सोबत्यांसमवेत बनू नजीरकडे गेले. त्यांना कळविले की, ''या 'खून बहा' मध्ये जी रक्कम तुम्हाला आमच्याकडून द्यावयाची आहे, ती देण्यास आम्ही आलो आहोत;'' परंतु त्यांनी गुपचूप पैगंबरांच्या हत्येचा कट रचावयास सुरवात केली. काही यहुदी म्हणाले, ''ही सुवर्णसंधी आहे. या छतावरून पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या डोक्यात दगड घालून त्यांना ठार करू म्हणजे त्यांच्या कृतीपासून (अल्लाहचे आश्रय असो) आम्हाला मुक्ती मिळेल.''

शत्रूच्या या कटाची बातमी पैगंबर मुहम्मद (स.) यांना मिळाली. त्यांनी आपल्या सोबत्यांना काहीही सांगितले नाही, कारण पैगंबरांना धोका वाटत होता की, जर यहुदी लोकांना त्यांचे स्वत:चे गुपित फुटल्याची शंका आली तर ते उघड उघड युद्धाकरिता उद्युक्त होतील. म्हणून पैगंबर तेथून शांतपणे निघून आले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पैगंबरांनी आपल्या सोबत्यांना तेथेच सोडले आणि स्वत: निघून आले पैगंबरांनी असे करण्याचे कारण हे होत नाही, की शत्रूंना मुस्लिमांच्या हजेरीची जाणीव राहावी. शत्रू पाठलागसुद्धा करू शकले असते. थोड्याच वेळात पैगंबरांचे सोबतीसुद्धा परत आले.

(इब्ने हिशाम, भाग ५, पृष्ठ ११९-१२०)

राष्ट्रद्रोहाच्या या भयंकर अपराधावर पैगंबरांनी कोणतीही कार्यवाही केली नाही.

बनू नजीरचा औस टोळीशी समझोता होता. म्हणून औस टोळीच्या मुहम्मद बिन मुस्लिम (रजि.) यांना खालीलप्रमाणे एक संदेश देऊन बनू नजीरकडे पाठविले. ''दहा दिवसांच्या आत तुमच्या टोळीतील सर्व लोकांना मदीना शहर सोडून जावे लागेल, तुम्ही आपल्यासोबत सर्व चल संपत्ती घेऊन जाऊ शकता. प्रत्येक वर्षी तुमच्या खजुरीच्या बागांतील खजुरीची फळे काढण्याचे तुम्हास स्वातंत्र्य असेल असा,'' तो संदेश होता.

आपल्या मित्र औस टोळीकडून कोणतीही मदत मिळू शकणार नाही, याची यहुदीना खात्री पटली. म्हणून ते या अटी मान्य करण्यास तयार झाले. परंतु दांभिकांचा सरदार अब्दुल्लाह बिन उबई बिन सलाल आणि त्याच्या सोबत्यांनी, यहुदी लोकांनी मदीना शहर सोडून जाऊ नये याकरिता कसोशीने प्रयत्न केले.

''ते आपल्या अश्रद्धावंत ग्रंथधारक बंधुंना म्हणतात, ''जर तुम्हाला काढले गेले तर आम्ही तुमच्याबरोबर निघू, आणि तुमच्याबाबतीत आम्ही कोणाचेही म्हणणे कदापि ऐकणार नाही, आणि जर तुमच्याशी युद्ध केले गेले तर आम्ही तुम्हाला मदत करू.''

(दिव्य कुरआन, ५९:११)

असे प्रोत्साहन दिले. (इब्ने हिशाम, भाग ३, पृष्ठ २००-२०१)

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितलेल्या अटीवर समझोता करण्यासंबंधी बनू नजीरच्या समंजस व धैर्यवान लोकांनी विचारविमर्श केला. परंतु टोळीचा सरदार हुई बिन अखतब हा आपल्या मित्रटोळी बनू कुरैजाकडून सहाय्य मिळण्याच्या आशेवर युद्धास तयार झाला आणि अशा प्रकारे ते किल्ल्याचा दरवाजा बंद करून आतमध्ये एकत्रित झाले.

दांभिक व बनू नजीर काही दिवसांपर्यंत मदतीची आशा करीत बसले. प्रतिसाद मिळाला नाही. अखेरीस त्यांनी शरणागतिचा निर्णय घेतला आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांना कळविले की, ''प्राणाचे अभय मिळाल्यास आम्ही मदीना सोडून जाण्यास तयार आहोत.'' पैगंबरांनी ही गोष्ट मान्य केली. याशिवाय प्रत्येक व्यक्तीला आपल्या उंटावर जितका शक्य असेल तितका माल वाहून नेण्याची परवानगी दिली. पाहा, त्यांची कठोर कृत्ये आणि त्याउलट या महान व्यक्तीचा दयाळूपणा !

बनू नजीर मदीना सोडून खैबरला निघून गेले. त्यांना दिलेली वचने पूर्ण केली गेली, येथपावेतो की त्यांनी आपल्याबरोबर घराची दारेसुद्धा काढून नेली आणि कोणतेही 'ब्र' शब्ददेखील काढला नाही. अशा प्रकारे ते ६०० उंटावर जितके सामान बळेच लादू शकले तितके आपल्याबरोबर घेऊन गेले. एवढेच नव्हे तर ते अशा प्रकारे रवाना झाले जणू एखाद मिरवणूक जात असावी. डफ, बांसरी, नाच, जणू अशा तऱ्हेने की पाहणाऱ्याला हाकलले असे वाटत नव्हते.

इस्लामी सहनशीलतेचे श्रेष्ठ उदाहरण असलेली एक घटना त्या वेळी अशी घडली.

मदीनेच्या अनेकेश्वरवादी लोकांत एक प्रथा होती. एखादी व्यक्ती नि:संतान राहिली अथवा एखाद्या संकटात पडली तर ती नवस करीत असे की, मूल झाले अथवा संकट टळले तर ती आपल्या मुलांना यहुदी धर्माची दीक्षा देईल. या प्रथेनुसर ते माता-पिता ज्यांनी हा नवस फेडला होता आणि नंतर मुस्लिम झाले, त्यांची मुले यहुदींच्या घरी वाढत होती. आता त्यांच्यासमोर एक समस्या उभी राहिली. बनू नजीर मदीना शहर सोडून जाऊ लागले त्यांनी या नवीन यहूदींना आपल्यासोबत घेऊन जाण्याचे ठरविले; परंतु आईवडिलांनी या गोष्टीला विरोध केला. समस्या पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या समक्ष आली तेव्हा त्यांनी सांगितले, ''धर्माच्या बाबतीत बळजबरी नाही.''

अशा प्रकारे पूर्वीच्या समझोत्यानुसार यहुदींचे पूर्ण स्वातंत्र्य अबाधित राहिले; तथापि त्यांना संधी मिळताच ते समझोत्याचा भंग करीत असत; परंतु मुस्लिमांनी एकदासुद्धा समझोत्याच्या विरुद्ध कृती करावी ही गोष्ट पैगंबर मुहम्मद (स.) यांना सहन

होणे शक्य नव्हते. अशा तऱ्हेने ते त्या सर्व तरुणांना व मुलांना घेऊन रवाना झाले.

(हदीस : सुनन अबू दाऊद-किताबुल जिहाद)

त्या वेळी मदीना शहरात संगठित यहुदी टोळी एकच उरली होती - बनू कुरैजा ही टोळी बनू नजीरची जवळची नातेवाईक होती आणि तिच्या दोन शाखा बनू काब व बनू अम्र होत्या. मदीना शहराच्या दक्षिणेस हे लोक राहत असत. त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन शेती होते. शेती-उत्पादनाच्या विक्रीमुळे ते धनाढ्य व सुखसंपन्न होते. दुसऱ्या टोळ्यांप्रमाणेच हे लोकदेखील पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याशी द्वेष व शत्रुत्वाचा व्यवहार करीत. परंतु ही गोष्ट इतक्या उघडरित्या होत नसे. दुसऱ्या दोन टोळ्या मदीना सोडल्यानंतरसुद्धा अशा धोरणांचा ते अवलंब करीत होते जे त्यांच्या विनाशाला कारणीभूत ठरणार होते. म्हणून त्यांना पूर्वीपेक्षा उग्र परिणामांना तोंड द्यावे लागले.

मदीना सोडून खैबरकडे जाणाऱ्या बनू नजीर टोळीच्या सरदारामध्ये हुई बिन अखतब आणि सलाम बिन अबी हकीक व त्यांचा भाचा कनाना बिन रबीअ होते. धार्मिक दृष्टीनेसुद्धा ते उच्चपदी होते. वरील सरदारांचे खैबरवासीयांनी सहर्ष स्वागत केले आणि त्यांना आपले सरदार मानले. परंतु या पदामुळे त्यांच्या मन मस्तिष्कातील आग विझली नाही. देशत्याग व अपमान त्यांच्या हृदयाला बोचत होते. त्यांच्या मनात वैर व शत्रुत्व आले होते. मुस्लिमांवर सूड उगविण्यासाठी त्यांची हृदये व्याकुळ झाली होती. म्हणून हुई बिन अखतब सर्वत्र मुस्लिमांच्याविरुद्ध शत्रुत्व पसरवू लागला. या सर्व गोष्टींचा परिणाम असा झाला की, हिजरी सन ५ मध्ये चोहीकडे सर्व अरब टोळ्यांनी एकत्रितपणे मदीना शहरावर हल्ला चढविला. या शत्रूंची संख्या वेगवेगळ्या कथनानुसार दहा ते वीस हजारपर्यंत होती. कमीतकमी संख्या अर्थात दहा हजारच मानली तर स्थितीचे गांभीर्य सहजपणे लक्षात येईल. कारण त्या वेळी मक्का सोडून आलेले मुस्लिम व मदिनातील अन्साराची एकूण संख्या तीन हजारांपेक्षा अधिक अजिबात नव्हती. युद्धाचे विवेचन या लेखाचा विषय नाही. युद्धाचे गांभीर्य उम्मुल मोमिनीन उम्मे सलमा (रजि.) यांच्या शब्दांत यापेक्षा अधिक चिंताजनक व चकित करणाऱ्या संकटाला पैगंबर मुहम्मद (स.) यांना कधीही तोंड द्यावे लागले नाही.

स्थितीच्या गांभीर्याची कल्पना उक्त कथनावरून एका सीमेपर्यंत केली जाणे शक्य आहे, परंतु अरब टोळ्यांपेक्षा अधिक कष्ट पैगंबर मुहम्मद (स.) यांना यहुदी टोळीकडून पोहचले. कुरैशी सैन्याने टोळधाडीप्रमाणे हल्ला चढविला. हुई बिन अखतबने बनू कुरैजाच्या प्रदेशात जाऊन त्यांना मुस्लिमांविरुद्ध उत्तेजित केले. बनू कुरैजाच्या काब बिन असद या सरदाराने प्रोत्साहन देत सांगितले, ''हा हल्ला चढविणाऱ्या प्रचंड सैन्याशी मिळून

मुस्लिमांना नष्ट करण्याची जी सुवर्णसंधी हाती आली आहे, तशी संधी पुन्हा कधी येणार नाही.'' काब प्रथमतः इन्कार करीत क्रोधित झाला. म्हणाला, 'पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकडून आजतागायत समझोत्याविरुद्ध कोणत्याही प्रकारची कृती झालेली नाही. अशा स्थितीत आम्ही कसा त्यांचा विरोध करू शकू?' परंतु हुईने काबला आमिष दाखवीत म्हटले, ''कोणता समझोता? कुठले मुस्लिम? पाहा, संपूर्ण अरब जगत आज त्यांच्याविरुद्ध उभे ठाकले आहे. मुस्लिमांचे चिन्हही उरणार नाही, असा दिवस आहे. अशा परिस्थितीत समझोता भंग करणाऱ्यावर हरकत घेण्यास कोण उरेल? म्हणून ही योग्य संधी कदापि दवडू नका. या टोळधाडीसारख्या सैन्याला साथ दिल्यास मुस्लिमांना कायमचे नेस्तनाबूत केले जाऊ शकते.'' काब हुईच्या जाळ्यात अडकला आणि त्याने त्याला सहाय्य करण्याचे वचन दिले. पैगंबर मुहम्मद (स.) यांना ही बातमी पोहचली, तेव्हा त्यांनी त्याची सत्यता जाणून घेण्यासाठी काही सोबत्यांना तिकडे रवाना केले. त्यांनी जाऊन अल्लाहच्या पैगंबरांशी केलेल्या समझोत्याची काबला आठवण करून दिली, तेव्हा तो गर्विष्टपणे म्हणाला, ''कोण अल्लाहचा पैगंबर ! आम्हाला माहीत नाही. मुहम्मद व आमच्या दरम्यान कोणताही समझोता नाही व मैत्रीही नाही.''

(इब्ने हिशाम, भाग ३, पृष्ठ २३१-२३३)

बाहेरील शत्रूंच्या तुलनेत आतील शत्रू किती नुकसान पोहचवू शकतात, यावरून त्याप्रसंगी उद्वेगतेच्या तीव्रतेची कल्पना करू शकता. ते शहराच्या उत्तरी भागात राहत असत व मुस्लिम त्या मागील भागात, म्हणून त्या दिशेने केव्हाही हल्ला केला जाऊ शकतो. याचे सदैव भय पैगंबर व मुस्लिमांना होते. काही नाही झाले तरी ते स्त्रिया व मुलांना त्रास देऊ शकतात याचेही भय होते आणि एके दिवशी ही शंका खरी ठरली.

पैगंबरांनी संरक्षणाच्या दृष्टीने स्त्रियांना बनू कुरैजांच्या वस्तीजवळील एका किल्ल्यात पाठवून दिले. शत्रूसेनेने मुस्लिमांची शक्ती व एकाग्रता नष्ट करण्यासाठी स्त्रियांवर हल्ला करण्याचे ठरविले. कोणत्या बाजूने हल्ला चढविला पाहिजे, याचा अंदाज लावण्यासाठी त्यांनी एक हेर पाठविला. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या आत्या माननीय सफिया (रजि.) यासुद्धा त्या स्त्रियांत होत्या. त्यांनी हेराला पाहून किल्ल्याचे रक्षक माननीय हस्सान बिन साबित (रजि.) जे त्या काळातील प्रसिद्ध अरबी कवि होते, त्यांना सांगितले की, ''काय पाहता? लवकर जा आणि त्याला ठार करा, नाही तर तो जाऊन आपल्या मित्रांना हल्ला करण्यास प्रोत्साहित करील.''

हस्सान कोणत्या तरी रोगामुळे लढाई करू शकत नव्हते. त्यांनी आपली असमर्थता

व्यक्त केली तेव्हा माननीय सफिया (रजि.) स्वत: 'मरीन किंवा मारीन' चा दृढ निश्चय करून त्याच्याशी दोन हात करण्यास तयार झाल्या आणि त्याच्या डोक्यावर जोराने सोटा मारला व त्याला ठार केले. मग त्यांनी त्याचे डोके शरीरापासून वेगळे करून भिंतीपलीकडे फेकून दिले, जेथे यहुदी राहत होते. कापलेले डोके पाहून यहुदी घाबरले. स्त्रियांच्या रक्षणासाठी येथे मुस्लिम फौज सज्ज आहे, या विचाराने अत्यंत भयग्रस्त होऊन त्यानी स्त्रियांवर हल्ला करण्याचा दुर्विचार सोडून दिला. (इब्ने हिशाम, भाग ३, पृष्ठ २२९)

अल्लाहने शत्रूसाठी अगदी प्रतिकूल परिस्थिती निर्माण केली. त्यांच्यात अविश्वास व फुटीरपणा वाढत गेला. एक महिनाभर मदीना शहराला वेढा देऊन शत्रू अयशस्वी परतले.

ज्या दिवशी या संकटातून मुक्ती मिळाली त्याच दिवशी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी बनू कुरैजाच्या विरुद्ध पाऊल उचलले आणि त्यांच्या किल्ल्याला वेढा दिला. अशा स्थितीत काब बिन असदने आपल्या जातीला उद्देशून सांगितले, ''मित्र हो! मी तुमच्यासमोर तीन गोष्टी ठेवतो, ज्यापैकी एक गोष्ट तुम्हाला मान्य करावी लागेल, एक अशी की आम्ही त्याच्यावर श्रद्धा बाळगावी. तुम्हाला इतक्या दिवसांत हा विश्वास झालाच असेल की, हा एक खरा पैगंबर आहे. आमच्या ग्रंथात त्यांच्या आगमनाची शुभ सूचनासुद्धा दिलेली होती.''

परंतु बनू कुरैजांनी ही गोष्ट मानण्यास नकार दिला. त्यांनी निर्णायक स्वरात सांगितले की, ''आम्ही तौरातला सोडून कोणत्याही अन्य ग्रंथाचा स्वीकार करण्यास तयार नाही.'' हे ऐकून काब म्हणाला, ''नाहीतर आम्ही आपल्याच तलवारीने आपल्या मुला-बाळांना ठार करू व मग मुहम्मदशी युद्ध करू. अल्लाह आमच्या व मुहम्मदच्या दरम्यान निर्णय करील. आम्ही जर नष्ट झालो तर आपल्या पुत्र-पौत्रांबद्दल पश्चात्ताप होणार नाही. अर्थात जिवंत राहिल्यास पुन्हा मुले-बाळे होतील. ही झाली दुसरी गोष्ट.''

काबने तिसरी गोष्ट समोर ठेवली, ''आज शनिवारची रात्र आहे. आज मुस्लिम आमच्याकडून निर्धास्त राहतील. या! रात्रीच्या अंधारात आम्ही त्यांच्यावर हल्ला चढवू, कदाचित आम्हाला यश मिळेल.'' (इब्ने हिशाम, भाग ३, पृष्ठ २४६-२४७)

तात्पर्य, यहुदी लोकांनी मुस्लिमांच्या वेढ्याला तोंड द्यावयाचे ठरविले. एका महिन्याच्या वेढ्यानंतर त्यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांना सांगितले की, ''साद बिन मुआज जो निर्णय देतील, आम्ही त्याचा स्वीकार करण्यास तयार आहोत.'' साद (रजि.) 'औस' टोळीचे सरदार होते. औस आणि बनू कुरैजा आपसात मित्र होते. म्हणून

स्वाभाविकत: जे माननीय साद (रजि.) यांच्याकडून सहानुभूतीची अपेक्षा ठेवीत होते. पैगंबरांनी त्यांची ही अट मान्य केली आणि वेढा उचलला. (हदीस : बुखारी)

बनू कुरैजा यांचा अपराध शीघ्रतेने माफ केला जावा असा नव्हता. याशिवाय बनू नजीरची देशातून हकालपट्टी केल्यानंतर जुन्या कराराचे नूतनीकरणही केले गेले होते. यामध्ये विशेषकरून मदीना शहरावर हल्ला झाल्यास ते मुस्लिमांबरोबर मिळून युद्ध करतील आणि शक्यतो सर्वप्रकारे सहकार्य करतील हे नमूद करण्यात आले होते. परंतु सहकार्य तर सोडाच, उलट त्यांनी कट-कारस्थान व उर्मटपणा सुरु केला आणि खंदकच्या युद्धप्रसंगी याउलट वागले. वरील करारात अशी अट होती की, प्रत्येक पक्षाला आपल्या धर्माचे पालन करण्याचे स्वातंत्र्य राहील. या कराराप्रमाणे जेव्हा एखाद्या यहुदीचा खटला पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या पुढे आणला जाई तेव्हा ते तौरातप्रमाणे निर्णय देत असत.

माननीय साद (रजि.) यांनी सर्वप्रथम यहुदी व पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकडून वचन घेतले की, ''मी जो काही निर्णय देईन, तो दोन्ही पक्षांनी मान्य केला पाहिजे.'' ते नंतर म्हणाले, ''तौरातच्या शिकवणीप्रमाणे प्रत्येक सज्ञान पुरुषाला ठार केले जावे, त्यांच्या पत्नी व मुलांना युद्धकैदी म्हणून ताब्यात घेतले जावे आणि त्यांची संपत्ती युद्धात मिळालेला लुटीचा माल समजून सैन्यात वाटली जावी. ही आहे त्यांच्या अपराधाची शिक्षा.''

पाहा, तौरातमध्ये काय लिहिले आहे, ''जेव्हा तू एखाद्या शहराजवळ युद्ध करावयास जाशील तेव्हा शांततेचा प्रस्ताव ठेवण्यात यावा. जर त्यांनी मांडलिकत्व स्वीकारून दरवाजे उघडली तर त्या शहरातील संपूर्ण वस्ती तुझी चाकर बनून तुझी सेवा करील, पण जर ते तुझे आज्ञाधारक न बनता लढाईस तयार झाले तर तू त्यांना वेढा घाल, त्यांच्या सर्व पुरुषांना तलवारीने ठार कर. तेथील स्त्रिया, मुले आणि जनावरे व संपत्तीला आपल्या ताब्यात घे. तुझ्या ईश्वराने तुझ्या शत्रूकडून तुला माल दिला आहे, त्याचा तू लाभ घेऊ शकतोस.'' (तकरार, २० : १०-१४)

अशा प्रकारे ठार केल्या गेलेल्या लोकांची संख्या विभिन्न कथनानुसार ४०० ते ७०० पर्यंत होती. एका स्त्रीचासुद्धा यात समावेश होता, जिने एका मुस्लिमाच्या डोक्यात दगड घालून त्याला ठार केले होते. त्यासाठी त्या स्त्रीला ठार केले गेले. हुई बिन अखतब त्या वेळेपर्यंत बनू कुरैजाबरोबर होता. म्हणून त्यालासुद्धा ठार केले गेले.

उपरोक्त कठोर शिक्षेला दोन महत्त्वपूर्ण कारणांच्या आधारे निंदनीय म्हटले जाऊ शकत नाही. एक कारण असे की, यहूदींचा पवित्र ग्रंथ तौरातचासुद्धा हाच निर्णय होता. दुसरे कारण असे की, त्यांनी स्वत: ज्याची पंच म्हणून निवड केली होती, त्याचाच हा

निर्णय होता. याच कारणास्तव यहुदींनी या निर्णयाविरुद्ध आवाज बुलंद केला नाही. एस. लाइन पॉल यासंबंधी जे काही लिहिले, ते येथे प्रस्तुत करणे उपयुक्त ठरेल. तो म्हणतो, ''यात काही शंका नाही की हा निर्णय फार कठोर व रक्त सांडणारा होता. राजकीय पक्षाविरुद्ध चर्चने केलेल्या फौजी कारवाईत अथवा ऑगस्टीनच्या काळात झालेला कार्यवाहीत याचे मोठे साम्य आहे.''

परंतु एक गोष्ट येथे उल्लेखनीय आहे की, यहुदींच्या अपराधाची शिक्षा मुख्यत्वेकरून युद्धस्थितीत राज्याविरुद्ध केल्या गेलेल्या देशद्रोहाच्या अपराधाची शिक्षा होती. ज्या व्यक्तीने लॉर्ड विलिंग्टनच्या प्रवासकथेत दरोडेखोरांना झाडावर फाशी दिल्या जाण्याचे वर्णन वाचले असेल, त्याला या देशद्रोही यहुदींना तलवारीच्या टोकाने ठार केले जाण्यावर आश्चर्य वाटणार नाही. (सिलेक्शन्स फ्रॉम दि कुरआन- लेनपूल, पृष्ठ ६५)

यावरून असा गैरसमज होऊ नये की, मदीना शहरात त्यानंतर एकसुद्धा यहुदी उरला नसावा. यहुदी मदीनेत होते, याचे पुरावेही आहेत. उदाहरणार्थ, बनू कैनकाअ या टोळीला हिजरी सन २ मध्ये देशाबाहेर काढले होते. परंतु हिजरी सन ३ मध्ये उहदच्या युद्धाप्रसंगी ते पैगंबर मुहम्मद (स.) यांना कुरैशच्याविरुद्ध मदत करण्याचे वचन देताना दिसतात. (हदीस: इब्ने साद, भाग २, पृष्ठ ३३ -३४)

खैबरच्या युद्धात बनू कैनकाअने पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यासमवेत भाग घेऊन युद्ध केले आणि युद्धानंतर पैगंबरांनी त्यांना मोबदलादेखील दिला, हेसुद्धा आपल्या निदर्शनात येईल. (हदीस: बैहकी, भाग ९, पृष्ठ ५३)

बनू कैनकाअपैकी एक गृहस्थ रिफाआ बिन सईद हा बनुल मुस्तलिकच्या युद्धानंतर मदीनेत वारला. (हदीस: सहीह मुस्लिम)

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी मृत्यूसमयी आपला चिलखत एका यहुदीजवळ गहाण ठेवला होता, ही गोष्ट प्रख्यात आहे. (हदीस: बुखारी)

या पुराव्यांवरून यहुदी मदीना शहरात राहत असून त्यांना व्यापार व स्वतंत्रपणे देवाण-घेवाण करण्याची पूर्ण मुभा असल्याचे स्पष्ट होते.

वरील घटनांवरून आम्ही या निष्कर्षाप्रत पोहचतो की, सर्व यहुदींना निर्वासित केले गेले नव्हते, तर त्यांच्यापैकी ज्यांचा देशद्रोह सिद्ध झाला, त्यालाच शिक्षा दिली गेली.

४. खैबर

यहुदींच्या बंडखोरीपासून मदीना मुक्त झाले होते. परंतु ते मदीना शहरापासून शंभर कोसाच्या अंतरावरील 'खैबर' नावाच्या ठिकाणी गोळा झाले. आता त्यांनी पुन्हा मुस्लिमांच्या विरुद्ध गुप्त कारस्थाने सुरु केली. मग मुस्लिम कसे शांतिपूर्ण जीवन जगू शकत होते? खंदकच्या युद्धावरून सिद्ध झाले होते की, यहुदी इस्लामी राज्याचे सदैव शत्रू बनून राहतील. त्याचबरोबर मदीना शहराचे रक्षण सुनिश्चित केल्याशिवाय संपूर्ण सेनेनिशी कूच करणेसुद्धा शक्य नव्हते. कारण मदीना शहरात सेनेचे अस्तित्व नसल्याची बातमी मिळाल्यास कुरैश अथवा त्यांची मित्रटोळी मदीनावर हल्ला करण्याची शक्यता होती. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी दोन्ही समस्या हाताळण्याचा निर्णय घेतला. हुदैबियाचा समझोता याच दूरदर्शीतेचे फळ होय. हिजरी सन ६ मध्ये पैगंबरांनी कालमर्यादेचा एक करार केला. त्यामुळे कमीतकमी दहा वर्षांपर्यंत कुरैश लोकांच्या आक्रमणापासून अभय मिळाले.

(इब्ने हिशाम, भाग ३, पृष्ठ ३३१-३३२, बुखारी, मुस्लिम)

पैगंबरांच्या राजनीतिक मुत्सद्दीपणा, सामरिक नैपुण्य व अदम्य धैर्याचा हा विजय होता. दिव्य कुरआनने याला स्पष्ट विजय म्हटले आहे.

एका बाजूने आश्वस्त झाल्यानंतर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी खैबरकडे मोर्चा वळविला. तेथे यहुदी आपल्या पूर्वजांच्या मित्रटोळ्या व गतफान टोळीशी संगनमत करून व शस्त्रास्त्रानिशी सज्ज होऊन मदीना शहरावर हल्ला चढविण्याच्या बेतात होते. पैगंबरांनी सर्वप्रथम खैबर व गिफानच्या दरम्यान रजीअ या ठिकाणी इस्लामी सेनेला एकत्र केले, जेणेकरून गिफानमधील यहुदींकडून खैबरच्या यहुदींना सैन्याची कुमक मिळू नये. परंतु जेव्हा गिफानवाले खैबरच्या यहुदींच्या मदतीसाठी निघाले तेव्हा इस्लामी सैन्याने त्यांच्या अंगणातच पडाव घातला असल्याचे पाहून परतण्यास विवश झाले.

(हदीस: तबूरी, भाग ३, पृष्ठ १५७५)

खैबरवरील आक्रमण जवळजवळ एक महिन्यात पूर्ण झाले. खैबरचे मोठमोठाले सरदार व उच्चपदस्थ लोक रणभूमीतच मारले गेले. उरलेल्या यहुदी लोकांना पूर्वीप्रमाणे खैबरमध्ये राहण्याची परवानगी दिली गेली. जमीन करारावर त्यांच्याच हवाली केली गेली. पीक कापणी वेळी खैबरला प्रतिनिधी पाठवून ठराविक प्रमाणात भाग वसूल करून केंद्रीय कोषागारात जमा केला जाई. याच युद्धानंतर हुई बिन अखतबची सुकन्या उम्मुल मोमिनीन माननीय सफिया (रजि.) पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याशी विवाहबद्ध झाल्या.

खैबरमध्ये एका यहुदी स्त्रीने पैगंबरांना विष देण्याचा प्रयत्न केला. ही बनू नजीर टोळीचा सरदार सलाम बिन मिश्कमची पत्नी जैनबा होती. तिने पैगंबर मुहम्मद (स.) आणि त्यांच्या सोबत्यांसाठी एक शेळी कापली. शेळीचा कोणता अवयव पैगंबरांना अधिक पसंत आहे याची माहिती तिने अगोदरच मिळविली होती. जेव्हा तिला कळले की, पैगंबरांना शेळीचे पाय विशेष पसंत आहेत. म्हणून तिने विशेषत: त्यावर मुद्दाम विष लावले. पैगंबरांच्या सेवेत तो भाग वाढला गेला. पैगंबरांनी शेळीच्या पायाचा एक तुकडा तोडून घेतला. तोंडात घालून चावले आणि यात विष असल्याचे सांगून थुंकून टाकले. त्या स्त्रीला बोलावून विचारले गेले. तिने गुन्हा कबूल केला व म्हणाली, ''माझ्या जातीच्या लोकांकडून आपल्यासंबंधी अनेक गोष्टी मी ऐकलेल्या आहेत. जर आपण बादशाह आहात तर आपल्याकडून आम्हाला मुक्ती मिळावी व जर आपण पैगंबर आहात तर आपल्याला अल्लाहकडून वह्य (दैवी संदेश) मिळेल की यात विष आहे. म्हणून मी हे कृत्य केले.'' हे ऐकून पैगंबरांनी तिला क्षमा केली, परंतु दोन-तीन दिवसांनंतर एका सहाबींचे (पैगंबरांचे सोबती) या शेळीचे मांस खाल्ल्यामुळे निधन झाले तेव्हा जैनबाला तिच्या अपराधासाठी ठार केले गेले. हे विष पैगंबरांच्या मृत्यू-रोगाला कारणीभूत ठरले.

(इब्ने हिशाम, भाग ३, पृष्ठ ६५२-६५३)

पैगंबर मुहम्मद (स.) यहुदी लोकांशी कसे वागले याचे एक वर्णन वर प्रस्तुत केले गेले आहे. पैगंबरांनी त्यांना पूर्ण स्वातंत्र्य दिले. मौलिक राजनीतिक आधार दिले. कोणत्याही प्रकारचा जिझिया अथवा कर त्यांच्यावर लादला नाही. असे असतानाही ते वारंवार वचनभंग करीत राहिले. शेवटी त्यांना सांगितले गेले, ''सामान घेऊन तुम्ही हवे तेथे निघून जा.'' तेही त्याच व्यक्तींना सांगितले गेले ज्यांचा गुन्हा सिद्ध झाला होता. एका मनुष्याच्या अपराधाची शिक्षा त्याच्याशिवाय कोणासही दिली जात नसते. बनू नजीर व बनू कैनकाअ यांच्याविरुद्ध कोणतीही कार्यवाही केली गेली नाही. कारण ते शांततापूर्वक मदीना सोडून जात होते.

उपरोक्त दोन्ही टोळ्यांशी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी अत्यंत सहानुभूतीपूर्वक व्यवहार केला. वास्तविकत: ते कठोर शिक्षेस पात्र होते. बनू कुरैजा या टोळीने अत्यंत उर्मटपणाचा परिचय दिला. परंतु त्यांनी दयामूर्ती पैगंबरांसमोर आपली समस्या ठेवली असती तर त्याचा निकालसुद्धा न्यायसंगतच लागला असता. परंतु त्यांनी पैगंबरांपेक्षा आपल्या साथीदारावर अधिक भरवसा केला. विशेष म्हणजे त्या मित्रानेसुद्धा त्यांच्या कायद्यानुसारच त्यांच्याविरुद्ध निकाल दिला.

दांभिक

'मुनाफिक' चा शाब्दिक अर्थ एकीकडून प्रवेश करणे व दुसरीकडून निघून जाणे होय. म्हणूनच अरबीत बोगद्याला 'नफख' म्हटले जाते. कारण मनुष्य यात एकीकडून प्रवेश करतो आणि दुसरीकडून निघून जातो. 'मुनाफिक'ची श्रद्धा सामूहिक असते. तो मोमिनांच्या (मुस्लिमांच्या) दरम्यान मोमिन असल्याचे जाहीर करतो आणि आपल्या मित्रांच्या दरम्यान गेल्यास इन्कार करतो. म्हणून त्याच्यात श्रद्धा स्थायी रूपात नसते. आत प्रवेश करताच निघून जाते. यास्तव त्याला दांभिक 'मुनाफिक' म्हटले गेले आहे.

दांभिकपणा एक रोग आहे. दिव्य कुरआनमध्ये दांभिकांचे वर्णन करताना म्हटले गेले आहे,

''त्यांच्या मनात आजार आहे.''

त्याचे कारणसुद्धा हेच आहे. दांभिकतेची दोन कारणे असतात. एक शंका, दुसरा भित्रेपणा. काही समीक्षकांनी वरील ठिकाणी शब्द 'मर्ज'चे भाषांतर 'भित्रेपणा' केले आहे. दांभिकांची शंका त्याच्या सिद्धान्तात असते आणि भित्रेपणा त्याच्या सिद्धान्तांना व्यावहारिक रूप देण्यात असतो. आंदोलन सफल झाले तर एखादे वेळी त्याच्या लाभापासून आपण वंचित राहू नये, असा विचार त्याच्या मनात घोळत असतो.

जोपर्यंत इस्लाम मक्केत होता, तोपर्यंत दांभिकपणाला स्थान नव्हते. त्या वेळी इस्लामचा स्वीकार करणे व त्याची घोषणा करणे म्हणजे तलवारीच्या धारेवर पाय ठेवण्या इतपत धोक्याचे होते. म्हणून तेथे शंका अथवा भीतीला स्थान नव्हते. यहुदी लोकांप्रमाणेच मदीना शहरात दांभिकांशीही संबंध आला.

१. अब्दुल्लाह बिन उबई

मदीना शहरातील औस व खजरज या दोन टोळयांनी आपसातील दीर्घकालीन युद्धाने कंटाळून हा निर्णय घेतला की, आता ते दोघेही एका सरदाराची निवड करतील आणि त्याच्या नेतृत्वात एकत्र राहतील. त्यांनी एकमताने निर्णय घेतला, ''भविष्यकाळात सर्व बाबतीत त्या व्यक्तीच्या नेतृत्वात चालू आणि सर्व मतभेदांच्या स्थितीत त्याच्या आज्ञेचे पालन करू.'' या सरदारपदासाठी त्यांनी औस टोळीचा एका सरदार अब्दुल्लाह बिन उबई याची निवड केली. त्याच्या राज्याभिषेकाची तयारी सुरू झाली.

दरम्यान पैगंबर मुहम्मद (स.) मक्केहून हिजरत करून मदीनाला पोहचले. दोन्ही टोळ्यांच्या सरदारांनी पैगंबरांपुढे मान तुकविली. अशा प्रकारे अब्दुल्लाह बिन उबईची

राज्याभिषेकाची मनिषा मनातच सुप्त राहिली. ''जर मुहम्मद (स.) आले नसते तर मी या जातीचा बादशाह झालो असतो,'' याचा राग शेवटपर्यंत त्याच्या मनात खदखदत होता. त्याच्या दृष्टीने पैगंबर (स.) त्याचे पद हिरावून घेणारे व्यक्ती होते.

प्रारंभी त्याने इस्लामचा स्वीकार केला नाही, पैगंबरांच्या भविष्यासंबंधी तो जाणू इच्छित होता. त्या वेळी त्याचा रोख मुस्लिम व विशेषत: पैगंबरांच्याकडे होता. उदाहरण म्हणून एका घटनेचे वर्णन पुरेसे आहे -

एकदा पैगंबर मुहम्मद (स.) औस टोळीचे सरदार साद बिन उबादा यांच्या तब्येतीची विचारपूस करावयास निघाले होते. रस्त्यात अब्दुल्लाह बिन उबई आपल्या मित्रांबरोबर बसलेला दिसला. काहीही न बोलता पुढे निघून जाणे योग्य न वाटल्यामुळे ते वाहनावरून खाली उतरले आणि सलाम करून त्याच्याजवळ जाऊन बसले. आपल्या सवयीनुसार त्यांनी काही आयतींचे पठन करून त्या ऐकविल्या आणि त्याला काही उपदेश केला. अब्दुल्लाह हे सर्व गुपचूप ऐकत राहिला. पैगंबरांनी आपले म्हणणे समाप्त केले तेव्हा तो म्हणाला, ''आपण जे काही करीत आहात, ते सत्य असेल तर याच्यापेक्षा अधिक चांगली कोणतीही गोष्ट नाही. परंतु कृपा करून आपण आपल्या घरी बसत जा. जर कोणी आपल्या घरी आला तर त्याला उपदेश करा आणि जर एखादा आपल्याकडे येत नसेल तर त्याला त्रास देऊ नका. जे ऐकण्यास इच्छुक नाहीत, त्यांच्यापाशी जाऊन ऐकविण्याची काही गरज नाही.''

हे ऐकून पैगंबर मुहम्मद (स.) तेथून निघून गेले. जेव्हा ते साद बिन उबादाजवळ पोहचले तेव्हा त्यांनी पैगंबरांच्या चेहऱ्यावर नाराजीचे चिन्ह पाहून परिस्थिती जाणून घेण्याची इच्छा व्यक्त केली. पैगंबरांनी संपूर्ण घटना ऐकविली. साद (रजि.) म्हणाले, ''हे अल्लाहचे पैगंबर! आपण अब्दुल्लाहच्या बोलण्याकडे लक्ष देऊ नका. अल्लाह शपथ! त्याला वाटते की तुम्हीच त्याचे राजमुकुट व राजसिंहासन हिसकावून घेतले आहे.''

(इब्ने हिशाम, भाग २, पृष्ठ २३४-२३८)

त्यानंतर अल्लाहने मुस्लिमांना जेव्हा उघड विजय दिला तेव्हा अब्दुल्लाह बिन उबई आणि त्याच्या मित्रांना वाटले की, आता अधिक वाट पाहिल्याने आणखी नुकसान होईल. म्हणून त्यांनी विवश होऊन पैगंबरांच्या हातात हात देऊन अनुयायित्व स्वीकारले. हा स्वीकार श्रद्धेमुळे नव्हता तर हा संधीसाधूपणा होता. जोपर्यंत तो जिवंत राहिला तोपर्यंत त्याने शक्यतो पैगंबरांचा विरोधच केला. त्यांच्या मार्गात अडचणी निर्माण करण्यापासून तो कधीही मागे हटला नाही.

२. दांभिकांची गुप्त कारस्थाने

हिजरतनंतर दुसऱ्या वर्षी बद्रचे युद्ध झाले त्यानंतरच्या वर्षी उहदचे युद्ध झाले. ज्याअर्थी कुरैश लोकांनी बद्रच्या युद्धात आपल्या पराजयाचा अपमान पुसून टाकण्याचा व त्यांच्या ठार झालेल्या लोकांचा सूड उगविण्याचा निश्चय केला होता, त्याअर्थी त्यांनी युद्धात आपली संपूर्ण शक्ती झोकून दिली. मदीना शहरात राहूनच मुकाबला केला जावा, असा पैगंबरांनी विचार केला.

अब्दुल्लाह बिन उबईचेसुद्धा हेच मत होते. परंतु उत्साही तरुणांनी हा विचार खोडून काढला. त्यांचा आग्रह होता की, स्त्रियांप्रमाणे घरात बसून युद्ध करणे योग्य नव्हे, तर शहराच्या बाहेर निघून मुकाबला केला पाहिजे. अखेरीस या तरुणवर्गाच्या सूचनेशी पैगंबर मुहम्मद (स.) देखील सहमत झाले आणि शहराच्या बाहेर जाऊन सामना करण्याचे ठरले. एक हजार लोकांसमवेत पैगंबर रवाना झाले. कुरैशच्या फौजेत सैनिकांची संख्या तीन हजार होती. जेव्हा पैगंबर अर्धा रस्ता चालून गेले आणि मौता नावाच्या जागी पोहचले तेव्हा अब्दुल्लाह बिन उबई आपल्या तीनशे साथीदारांसमवेत मदीनेला परतला. तो म्हणाला, "पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आमचे म्हणणे ऐकले नाही आणि मुद्दाम मृत्यूच्या घशात आम्ही जाऊ इच्छित नाही." काही लोकांनी त्याला उपदेश केला, "अशा प्रकारच्या संकटकाळात आपल्या जातीची व अल्लाहच्या पैगंबरांची शक्ती क्षीण करू नका. शत्रू आपल्यासमोर आहे. कठीण परिस्थितीचा विचार करा आणि परत या." परंतु याचा त्याच्यावर काहीही परिणाम झाला नाही. तो आपल्या आग्रह व हट्टीपणावर अडून बसला. अशा तऱ्हेने संकटप्रसंगी त्याने मुस्लिमांना धोका दिला. (इब्ने हिशाम, भाग ३, पृष्ठ ६८)

उहदच्या युद्धात मुस्लिमांची फार मोठी हानी झाली. सहाबा (रजि.) पैकी काही विशेष व्यक्ती हुतात्मा झाल्या, इतकेच नव्हे तर पैगंबर मुहम्मद (स.) स्वत:देखील जखमी झाले. पैगंबर जेव्हा शुक्रवारचे प्रवचन करून बसत असत देव्हा अब्दुल्लाह बिन उबई लोकांना म्हणत असे की, "लोकहो! हे अल्लाहचे पैगंबर आहेत. यांच्यामुळेच अल्लाहने आम्हाला प्रतिष्ठा दिली आहे. यांना सर्वप्रकारे सहाय्य देऊन यांचे हात मजबूत करणे आमचे कर्तव्य आहे."

दीर्घ काळापर्यंत हीच त्याची सवय राहिली. उहदच्या युद्धानंतरसुद्धा जेव्हा अब्दुल्लाह बिन उबई तेच शब्द सांगण्यासाठी उभा राहिला तेव्हा कुणीतरी त्याला हाताला धरून खाली

बसवीत म्हटले, ''हे अल्लाहच्या शत्रू! तुला काही लाजलज्जा आहे की नाही? तू कोणत्या तोंडाने आम्हाला उपदेश देणार आहेस? कशा प्रकारची फसवणूक तू केलीस, काय तुला माहीत नाही?'' हे ऐकून क्रुध्द अब्दुल्लाह बिन उबई मस्जिदमधून बाहेर निघाला. दरवाजाजवळ कुणीतरी त्याला प्रश्न केला, ''कुठे निघालात?''

तेव्हा त्याने उत्तर दिले, ''मी त्या व्यक्तीच्या (पैगंबर मुहम्मद (स.)) बाजूने बोलण्यास उभा राहिलो होतो; परंतु तिच्या सोबत्यांनी माझा अपमान केला, जणू मी एखादा अपराध केला असावा.''

दुसरी व्यक्ती म्हणाली, ''या पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकडे जाऊ, ते तुमच्या क्षमेसाठी प्रार्थना करतील.''

तेव्हा तो उत्तरला, ''मी येणार नाही आणि मला त्या व्यक्ती (पैगंबर मुहम्मद (स.)) च्या प्रार्थनेची गरज नाही.'' (इब्ने हिशाम, भाग ३, पृष्ठ १११)

उहदच्या युद्धानंतर बनू नजीर कांडच्या वेळी याच अब्दुल्लाह बिन उबई आणि मालिक बिन नोफल व साथीदारांनी पैगंबरांना सांगितले होते, ''अजिबात घाबरू नका, आम्ही तुम्हाला सर्व प्रकारचे सहाय्य करू.'' याचा वर उल्लेख केलाच आहे. अशा प्रकारच्या प्रयत्नांचाच हा परिणाम होता की ती घटना इतकी लांबली आणि बनू नजीरने शरणागती पत्करण्यास नकार दिला.

हिजरतनंतर पाचव्या वर्षी खंदकचे युद्ध झाले. इतर लोकांप्रमाणेच पैगंबर मुहम्मद (स.) सुद्धा खंदक खणण्यात, माती काढण्यात सहभागी होते. या प्रसंगीसुद्धा दांभिक परत गेले होते. कडक थंडीचा ऋतू होता, तीव्र भूक व तहान लागली असतादेखील काम करावे लागत होते. मुस्लिम, सहनशीलता व धैर्याने रात्रदिवस काम करीत होते. या कामात भाग घेण्यापासून रोखणारे एखादे काम निघत असे, तेव्हा ते पैगंबरांची परवानगी घेऊन जात असत. परंतु दांभिकांची तऱ्हा यापेक्षा अगदीच वेगळी होती. ते काम फार आळशीपणाने करीत होते. ते दुसऱ्यांची दृष्टी वाचवून काम सोडून पळून जात आणि कामात नुकसान करीत.

युद्ध अथवा दुसऱ्या संकटाच्यावेळी लोकांत ऐक्य, साहस व शक्तीची आवश्यकता असते. अशा स्थितीत जनतेत भय व निराशा पसरविणाऱ्या गोष्टींचा प्रसार करणे अत्यंत हानिकारक असते. युद्ध कितीका लांब जाईना, जोपर्यंत लोकांत परस्पर सहकार्य व धैर्य

आहे, तोपर्यंत ते युद्धभूमीत मागे हटत नाहीत आणि स्थितीवर नियंत्रण प्राप्त करून विजय मिळणे शक्य होते. म्हणून युद्धस्थितीत भीती व निराशाजनक गोष्टींचा प्रसार करणाऱ्यांना देशद्रोही म्हणून शिक्षा दिली जाते.

दांभिक अशा युद्धाप्रसंगीसुद्धा मुस्लिमांना सर्व प्रकारची हानी पोहचविण्याचा प्रयत्न करीत असत.

अशा प्रसंगी दांभिक चेष्टा करीत प्रश्न विचारीत, "आम्हाला किसरा व कैसरचे (रोम व इराण) खजिने मिळतील. याचे वचन दिले गेले होते परंतु प्रत्यक्ष स्थिती अशी आहे की जर एखादा शौचास गेला तर शाश्वती नाही की तो परत येईल की नाही."

(हदीस: इब्ने हिशाम)

इतकेच नव्हे तर जेव्हा शत्रूने वेढा अधिक आवळला तेव्हा दांभिकापैकी एक-एकजण येऊन सांगू लागला, "आमची घरे असुरक्षित आहेत. शत्रू त्यात घुसतील. आम्हाला घराची राखण करण्यासाठी परत जाण्याची परवानगी द्या." यालाच दिव्य कुरआनने म्हटले की, "वास्तविकत: हा युद्धातून पळ काढण्याचा उपाय होता." त्यांचा उद्देश केवळ इतकाच नव्हता की, मुस्लिमांची शक्ती कमी व्हावी तर जनतेत भय व निराशेचे वातावरण पसरावे आणि असे असतानादेखील पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांना परत जाण्याची परवानगी दिली. इतकेच नव्हे तर जेव्हा अल्लाहने या संकटातून मुस्लिमांना मुक्ती दिली व शत्रू स्वत:च वेढा उठवून निघून गेले, तेव्हा पैगंबरांनी दांभिकाकडे याबाबत कसलीही चौकशी केली नाही.

हिजरतच्या सहाव्या वर्षी बनू मुस्तलिकच्या विरुद्ध कार्यवाही केली गेली.[१] या युद्धात पैगंबरांनीसुद्धा भाग घेतला होता. इस्लामी सैन्याने मरीसीअ सरोवराजवळ पडाव टाकला होता. एके दिवशी एका अन्सारी व मुहाजिरमध्ये भांडण झाले. अब्दुल्लाह बिन उबई हे पाहून नाराज झाला आणि म्हणाला, "या मुहाजिर (हिजरत करून आलेले) लोकांनी खूपच त्रास दिला आहे. मदीनेला गेल्यानंतर या तुच्छ मंडळींना तेथून हाकलून देऊ." आपल्या मित्रांना असे सांगितले की, "या आपत्तीला तुम्हीच निमंत्रण दिले होते. तुम्हीच त्यांना आपल्या घरात जागा दिली. आपल्या धन-संपत्तीत त्यांना भागीदार बनविले. जर

१. खुजाआ टोळीची एक शाखा बनू मुस्तलिक मदीन्यावर हल्ला करण्याची तयारी करीत होती.ही बातमी मिळाल्यावर पैगंबर (स.) यांनी त्यांच्याविरुद्ध कार्यवाही केली.

तुम्ही असे केले नसते तर त्यांची मजल येथपर्यंत पोहचली नसती.''

''आम्ही मदीन्याला परत जाऊ तेथून तुच्छ लोकांना हाकलून देऊ अर्थात मुस्लिमांना,'' असे अब्दुल्लाह बिन उबई म्हणत असल्याचे पैगंबरांना कळाले.

हे ऐकून माननीय उमर बिन खत्ताब (रजि.) यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकडे विनंती केली, ''अब्दुल्लाहला ठार करण्यात यावे.'' पैगंबरांनी उत्तर दिले, ''उमर! मुहम्मद आपल्याच लोकांना ठार करवीत आहे, असे लोकांनी म्हणावे असे तुम्हाला वाटते का? नाही, हे कदापि शक्य नाही.''

जेव्हा अब्दुल्लाह बिन उबई आणि मुस्लिमांना कळाले की, या गोष्टीची बातमी पैगंबर मुहम्मद (स.) यांना कळाली आहे, तेव्हा ते स्वत: पैगंबरांकडे आले. पैगंबरांनी विचारले, ''त्यांचे मूळ शब्द काय होते?'' त्यांनी शपथ घेऊन सांगितले, ''अशा प्रकारची वाक्ये आम्ही उच्चारली नाहीत.'' पैगंबरांनी त्याचे म्हणणे मान्य केले आणि ती बाब निकालात काढली. याच कारणास्तव दिव्य कुरआनने स्पष्ट केले की, अब्दुल्लाह खोटे बोलला व त्याने त्या शब्दांचा प्रयोग केलेला आहे. हदीसमध्येसुद्धा दांभिकाची ओळख सांगताना आले आहे, ''तो जेव्हा बोलतो तेव्हा खोटे बोलतो.''

(हदीस: बुखारी, मुस्लिम)

या गोष्टीच्या चर्चेला फारच ऊत आल्याने अब्दुल्लाह बिन उबईच्या मुलाने (ज्याचे नावसुद्धा अब्दुल्लाह होते) पैगंबरांकडे जाऊन निवेदन केले, ''मी ऐकले आहे की आपण माझ्या वडिलांना ठार करण्याची परवानगी देणार आहात. मला भय आहे की जर एखाद्या दुसऱ्या व्यक्तीने हे काम केले तर माझ्या क्रोधावर माझे नियंत्रण राहणार नाही. म्हणून माझी विनंती आहे की, त्यांना ठार करण्याची आज्ञा मला देण्यात यावी. मी स्वत: आपल्या वडिलांचे शीर आपल्या सेवेत हजर करीन.'' पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्याचे सांत्वन केले आणि म्हणाले, ''जोपर्यंत तुमचे वडील आमच्याबरोबर राहतील, आम्ही त्यांच्याशी सौम्य व्यवहार करू.'' (इब्ने हिशाम, भाग ३, पृष्ठ ३०५)

बनू मुस्तलिकच्या या युद्धावरून परत येताना एक घटना समोर आली. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या पत्नी माननीय आएशा (रजि.) वर आरोप लावण्यास ती घटना कारणीभूत ठरली. या खोट्या, दु:खद व खेदजनक घटनेमागेसुद्धा या दांभिकांचा हात होता. काही साधेभोळे मुस्लिमसुद्धा दांभिकांच्या या बोलण्यात भरकटले व त्यांच्या हातून

अयोग्य कृत्य घडले. याउलट पैगंबरांनी त्यांना क्षमा केली. (हदीस: बुखारी)

हिजरी सन ९ मध्ये मक्कावर विजय मिळविल्यानंतर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी रोमविरुद्ध युद्ध करण्यासाठी रवाना होण्याची घोषणा केली. या युद्धाला तबूकचे युद्ध म्हणतात. हे कठोर परीक्षेचे दिवस होते. देशांत सर्वत्र दुष्काळ पडला होता. तीव्र उन्हाबरोबर रस्तादेखील फार लांबचा होता. पैगंबर मुहम्मद (स.) प्रत्येक वेळी युद्धावर जाताना लक्ष्य गुप्त ठेवीत असत. परंतु अंतराचा विचार करून व तयारीच्या दृष्टीने त्यांनी सेनेला कूच करण्यापूर्वी त्यांच्यासमोर लक्ष्यसुद्धा स्पष्ट केले. या युद्धातसुद्धा दांभिक अडथळे आणीत होते.

आरंभी ते लोकांत भीती व शंका उत्पन्न करू लागले. अफवा पसरवीली की, ‘‘इतक्या तीव्र उन्हात इतक्या दूरचा प्रवास कसा शक्य होईल? आधीच उपासमार सुरू असताना प्रवासाची तयारी कशी काय करणार? इतके लांब जाण्याचा शेवटी काय उद्देश आहे? बहुधा सबैलम नावाच्या यहुदीच्या घरी ते जमा होत आणि लोकांना मार्गभ्रष्ट करणाऱ्या योजना तयार करीत. त्यांच्या बाबतीत पैगंबर मुहम्मद (स.) यांना लगेच बातम्या मिळत असत. जरी त्यांनी त्यांच्याशी उदारतेचा व्यवहार केला तरी त्यांनी त्यांचे आश्रयस्थान सुबैलमच्या घराला आग लावण्याची आज्ञा दिली.

यानंतर ते पैगंबरांच्याकडे आले आणि शपथ घेऊन आपली विवशता व्यक्त करू लागले. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांना आपल्या देशातच राहण्याची स्वेच्छेने अनुमती दिली. फौज रवाना झाली तेव्हा अब्दुल्लाह बिन उबई आणि त्याचे साथीदार त्यांच्यासमवेत निघाले आणि पहिला टप्पा सनीयतुल विदाअहूनच परतले. त्या काळी मित्र व कुटुंबीय मंडळी आपल्या नातेवाईकांना व मित्रांना निरोप देण्याकरिता सनीयतुल विदाअपर्यंत जात असत. दांभिकांनी आपला पडाव मुस्लिमांच्या पडावापासून लांब ‘दबाव’ नामक जागी घातला. कदाचित त्यांचा उद्देश ऐक्याचा अभाव पाहून मुस्लिम सैन्यात भय व निराशा फैलावणे होता; परंतु मुस्लिमांवर त्यांच्या कारस्थानांचा काहीही परिणाम होत नव्हता. दुसऱ्या दिवशी जेव्हा प्रवासाचा प्रारंभ झाला तेव्हा ते हळूच मदीन्याला परतले. पैगंबरांनी तबूककडून परतल्यावरसुद्धा त्यांच्याविरूद्ध कोणतीही कार्यवाही केली नाही.

३. अब्दुल्लाह बिन उबईचा मृत्यू

या घटनेनंतर अल्पावधितच अब्दुल्लाह बिन उबईचा मृत्यू झाला. त्याचे पुत्र अत्यंत निष्ठावान व अल्लाह आणि त्याच्या पैगंबरांवर आपले प्राणसुद्धा अर्पण करणारे मुस्लिम होते. जेव्हा त्यांच्या पित्याचा मृत्यू झाला तेव्हा ते पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकडे आले व विनंती केली, ''माझ्या पित्याला कफन (प्रेतवस्त्र) साठी आपण आपला 'झुब्बा' (लांब सदरा) द्यावा.'' पैगंबरांनी त्यांची विनंती सहर्ष मान्य केली व आपला सदरा काढून दिला. त्यानंतर अब्दुल्लाह बिन उबईचे चिरंजीव (ज्यांचे नावसुद्धा अब्दुल्लाह होते) पुन्हा आले आणि विनंती केली, ''माझ्या वडिलांची 'नमाजे जनाजा' (प्रेतासाठी नमाज) सुद्धा आपणच पढवावी. यासाठीदेखील पैगंबर मुहम्मद (स.) तयार झाले. उमर बिन खत्ताब (रजि.) यांना ही गोष्ट कळली तेव्हा त्यांनी पैगंबरांना रोखण्यासाठी विचारले, ''आपण या दांभिकाचा अत्यसंस्कार करण्याचे ठरविले आहे काय? आपणास आठवत नाही की त्याने कसल्या-कसल्या प्रसंगी काय-काय सांगितले आणि काय काय केले? त्याने आम्हालासुद्धा किती हानी पोहचविली?'' पैगंबरांनी स्मित हास्य केले आणि म्हणाले, ''मी एक निर्णय घेतला आहे. कारण अल्लाहने मला तो अधिकार दिला आहे.''

पैगंबर (स.) म्हणाले, ''जर अल्लाहने सत्तरपेक्षा अधिक वेळा प्रार्थना केल्यानंतर त्याला क्षमा केली तर मी त्यासाठीदेखील तयार आहे आणि पैगंबरांनी त्याची 'नमाजे जनाजा' अदा केली.'' (इब्ने हिशाम, भाग ४, पृष्ठ १४७)

या घटनेबरोबरच दिव्य कुरआनने आदेश दिला, ''पैगंबरांनी कोणत्याही दांभिकाकरिता 'नमाजे जनाजा' पठन करू नये.'' दांभिकांना राग अनावर झाला. परंतु अब्दुल्लाह बिन उबईच्या मृत्यूमुळे त्यांच्या पाठीचा कणाच मोडला होता. अब्दुल्लाह बिन उबई शत्रुत्वामुळे दांभिकाचा सरदार होता आणि जोपर्यंत जिवंत राहिला तोपर्यंत सर्व प्रकारच्या गुप्तकर कारस्थानांमध्ये सामिल राहिला. दुसऱ्या दांबिकांकरिता हे केंद्रीय स्थान होते. म्हणून त्याच्या मृत्यूबरोबरच दांभिकांची शक्ती संपुष्टात आली आणि त्यांचे संगठन छिन्नविच्छिन्न झाले.

दांभिक, विषारी सर्पासमान शत्रू होते, कारण ते सकृद्दर्शनी मुस्लिम होते. मुस्लिमांबरोबर मिळून नमाज अदा करण्यात व अनेक सल्लामसलतीत ते सामील असत. म्हणून सर्व रहस्यांशी ते परिचित राहत. त्याचबरोबर जेव्हा जेव्हा त्यांना संधी मिळे तेव्हा

आपल्या विषारी दाताने मुस्लिमांचा चावा घेण्यात ते दिरंगाई करीत नसत. पैगंबर मुहम्मद (स.) यांना त्यांच्याबाबतीत इत्यंभूत माहिती होती, परंतु त्यांनी त्यांच्याशी सदैव क्षमेचाच व्यवहार केला.

या वर्णनावरून पूर्णत: स्पष्ट होते की, इस्लामचे पैगंबर मुहम्मद (स.) आपल्या शत्रूशी कसा व्यवहार करीत? पैगंबरांचे आतले व बाहेरचे शत्रू होते मक्का शहराचे अनेकेश्वरवादी आणि मदीना शहराचे यहुदी. पैगंबरांच्या 'उम्मत' (अनुयायी) मध्ये ते सर्वजण सामील नव्हते. ते बाहेरचे शत्रू होते. परंतु हे दांभिक त्यांचे आतील शत्रू होते. तरीसुद्धा पैगंबरांनी त्या प्रत्येकाशी सहानुभूती व क्षमेचा व्यवहार केला. पैगंबरांनी त्या वेळेपर्यंत औदार्य दाखविले जोपर्यंत एखाद्याने क्षमेचे द्वार स्वत:च आपल्यासाठी बंद करून घेतले नाही.

काय जगाच्या कोणत्याही बादशाह अथवा सुधारकामध्ये असा आदर्श आढळू शकतो? कदापि नाही!

- समाप्त -